




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १२३ * नांदेड * शनिवार, दि. १० मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# भारत-पाकिस्तान युद्ध : पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्याला भारताचे जबरदस्त उत्तर

## जैसेलमेरमध्ये दोन ड्रोन पाडले, अंवतीपुराच्या बेसवर १५ ते २० मोठे धमाके



**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** पाकिस्तानकडून पुन्हा एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्यात आलं असून भारताच्या अनेक शहरांवर ड्रोन हल्ले झाल्याची माहिती आहे. पण हे सर्व ड्रोन हल्ले भारताने निकामी केले असून पाकिस्तानला पुन्हा तोंडावर पाडण्याची कामगिरी केली. जैसेलमेरमध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानचे दोन ड्रोन पाडले आहेत. अवंतीपुरामध्येही भारताने तशीच कारवाई केली.

उरी सेक्टरमध्ये पाकिस्तानकडून जोरदार गोळीबार सुरू झाला झाला आहे. त्याला भारताकडूनही प्रत्युत्तर देण्यात येत आहे. त्यामुळे सीमावर्ती भागात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची स्थिती आहे. पाकिस्तानने पूंछ आणि कुपवाडा सेक्टरमध्येही सीमेपलीकडून गोळीबार केला. सीमेपलीकडून ड्रोन डागण्यात आले आहेत. नौगाम हंदवाडा सेक्टरमध्येही पाकिस्तानकडून गोळीबार करण्यात आला.

पाकिस्तानने अवंतीपुरा हवाई दल तळावर ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने ते हवेतच नष्ट केले. पाकिस्तानी ड्रोन पाडण्यात आले तेव्हा १५-२० स्फोटांचे आवाज ऐकू आले. कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

सध्या देशभरातील सातहून अधिक संवेदनशील ठिकाणी लष्करी हालचाली तीव्र झाल्या आहेत. सांबा, जम्मू आणि पठाणकोट मध्ये ड्रोन हालचालींसह गोळीबार आणि ब्लॅकआउटचे वृत्त आहे. उत्तर काश्मीरमधील कुपवाडा, उरी, नौगाम-हंदवाडा सेक्टर आणि पूंछमध्ये नियंत्रण रेषेजवळ जोरदार गोळीबार सुरू आहे. सुरक्षा दल पूर्ण दक्षतेने प्रत्येक आघाडीवर प्रत्युत्तरात्मक कारवाईत गुंतले आहेत.

जम्मू, सांबा आणि पठाणकोटमध्येही ड्रोन दिसल्याची पुष्टी झाली आहे. सुरक्षा दलांनी या ड्रोन हालचालींवर तात्काळ कारवाई केली आणि त्यांना निष्क्रिय केले. संपूर्ण परिसरात हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

पाकिस्तानकडून झालेल्या ड्रोन हल्लयाचा व्हिडीओही समोर आला आहे. सुरक्षा दलांनी लगेच प्रत्युत्तर दिले आणि हवेत इंटरसेप्टर क्षेपणास्त्र सोडले. स्फोटाचा हलका आणि सौम्य आवाज दूरवरून स्पष्टपणे ऐकू येतो, ज्यामुळे ड्रोन निष्क्रिय होतो. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात अलर्ट जारी करण्यात आला आहे आणि लष्कराने शोध मोहीम सुरू केली आहे.

भारतीय सुरक्षा दलांनी जम्मू आणि राजस्थानमधील पोखरणमध्ये संशयास्पद ड्रोन घुसखोरी यशस्वीरित्या उधळून लावली. हाय अलर्ट दरम्यान, ड्रोनला अडवण्यात आले आणि निष्क्रिय करण्यात आले, ज्यामुळे संभाव्य धोका टळला.

पंजाबमधील तरणतारण परिसरात स्फोटांचे मोठे आवाज येत आहेत. तरण तारण परिसरातही पाकिस्तानने तोफगोळे डागल्याची शक्यता आहे. गुजरातमधील कच्छमध्ये संपूर्ण ब्लॅकआऊट करण्यात आलं आहे. पाकिस्तानने केलेल्या हल्लयाच्या पार्श्वभूमीवर ही खबरदारी घेण्यात आली आहे.

**पाकड्यांचा दृष्टपणा, आपल्या नागरिकांना मृत्यूच्या दरीत लोटले**

ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तान इतका चवताळला आहे की त्यांना आपल्या सामान्य नागरिकांचीही चिंता नाही. शुक्रवारी कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले की, पाकिस्तानने नागरी विमानांना ढाल बनवत आहे. पाकिस्तान भीषण ड्रोन हल्ले करत होते त्यातच त्यांना दमम ते लाहोर या दरम्यान विमाने सुरू ठेवली. हल्लयादरम्यान विमानसेवा सुरू होती यामुळे सामान्य नागरिकांचे नुकसान होत होते. त्यांनी फोटोच्या माध्यमातून पाकिस्तानचा दृष्टपणा उघड केला आहे.

फोटो दाखवत त्यांनी पाकिस्तान आपल्या नागरिकांना मृत्यूच्या दरीत कसे ढकलत आहे हे दाखवले. फोटोद्वारे त्यांनी दमम ते लाहोर पोहोचलेल्या फ्लाईटचे डिटेल्स, वेळ आणि रूटची माहिती दिली होती.

गुरूवारी पाकिस्तानने भारताच्या १५ शहरांच्या सैन्य ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न केला मात्र भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीमने एस-४००ने सर्व हल्ल्यांना निष्फळ केले. शुक्रवारी परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी गुरूवारच्या घटनाक्रमावर अधिकृत ब्रिफींग दिले.

कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, काल रात्री पाकिस्तानने घुसखोरीचा प्रयत्न केला. सीमेपार ३०० ते ४०० ड्रोनचा वापर करत घुसखोरीचा प्रयत्न केला. मात्र हा प्रयत्न हाणून पाडला. त्यांनी सांगितले की प्राथमिक तपासानुसार हे समजले की हे ड्रोन तुर्कीचे होते. याला भारतीय लष्कराने संयमाने उत्तर दिले.

**प्रादेशिक सैन्याच्या १४ बटालियन सज्ज करण्याचे आदेश**

पाकिस्तानसोबत सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने भारताच्या प्रादेशिक सैन्याच्या १४ बटालियन सज्ज करण्याचे आदेश दिले आहेत. या सैनिकांना बोलावून देशसेवेत सहभागी करुन घेण्याचे अधिकार केंद्र सरकारने भारताचे लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांना दिले आहेत. सैन्य नियम, १९४८ च्या नियम ३३ अंतर्गत कोणत्याही प्रादेशिक सैन्य अधिकाऱ्याला किंवा जवानाला लष्कराच्या नियमित दलांना मदत करण्यासाठी बोलावण्याचा अधिकार लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांना दिले आहेत.







### राज्यात बड्या अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

भारत आणि पाकिस्तानच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महत्त्वाच्या पदांवरील विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. भारत पाक युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतलाय. भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले.

### लष्करप्रमुखांना पुढील ३ वर्षांसाठी सर्वाधिकार

भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत बैठकांचा जोर असून गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. दुसरीकडे संरक्षण मंत्रालयाने सैन्य दलाला महत्त्वाचे अधिकार दिले असून पुढील ३ वर्षांपर्यंत हे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तिनही सैन्य दलाच्या प्रमुखांसाठी संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली आहे. टेरिटोरियल आर्मी नियम १९४८ च्या नियम ३३ नुसार भूदल प्रमुखांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार, टेरिटोरियल आर्मीच्या सर्वच अधिकारी आणि सैनिकांना आवश्यक सुरक्षा ड्यूटी नियमित सेना के समर्थन में सक्रिय सेवेत बोलवू शकतात. सध्या ३२ टेरिटोरियल आर्मी इन्फँट्री बटालियनमधील १४ बटालियन देशाच्या विविध सैन्य दलांना, साउदर्न कमांड, ईस्टर्न कमांड, वेस्टर्न कमांड, सेंट्रल कमांड, नॉर्दर्न कमांड, साउथ-वेस्टर्न कमांड, अंदमान व निकोबार कमांड आणि आर्मी ट्रेनिंग कमांड येथे तैनात करण्यात येईल. भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून गॅजेट अधिसूचना प्रसिद्ध करुन लष्करप्रमुखांना म्हणजेच सेनाध्यक्षांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सैन्य सेवेसंदर्भात ९ फेब्रुवारी २०२८ पर्यंत सेनाध्यक्षांकडे हे सर्वाधिकार असणार आहेत. त्यामुळे, भारत सरकारने पुढील ३ वर्षांसाठी सैन्य दलाच्या प्रमुखांना युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकार दिले आहेत.

# किनवटमध्ये वळीवाच्या पावसाची हजेरी

**किनवट (प्रतिनिधी)–** वैशाखाच्या उन्हात अंगाची काहिली होत असताना शुक्रवार, दि.९ सायंकाळी वातावरणातील बदलानंतर शहरात वळीवाच्या पावसाची हजेरी लागली. हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसानंतर दमट वातावरण निर्माण झाले.

एप्रिल महिन्याच्या आरंभापासूनच कमाल तापमान ४१ ते ४४ अंशांपर्यंत पोहोचले होते. उन्हाच्या तडाख्यासह किमान तापमानातील चढ -उतारामुळे उष्णतेतही मोठी वाढ झाली. दि.२८ एप्रिलपासून वैशाख मासाला प्रारंभ झाला. वैशाख वणव्याच्या उन्हामुळे सकाळी ९ वाजेपासूनच नागरिक घामाघूम होत आहेत. शुक्रवारी दुपारपासून वातावरणातील बदलानंतर आकाशात मळभ दाटून आले. त्यानंतर सायंकाळी सव्वासात वाजता वळीवाच्या पावसाला सुरुवात झाली. जवळपास अर्धा तास बरसलेल्या हलक्या ते मध्यमस्वरुपाच्या पावसा मुळे वैशाख वणव्यात होरपळणाऱ्या जिवांना काहीअंशी दिलासा मिळाला. परंतु, त्यानंतरच्या दमट वातावरणामुळे नागरिक घामाघूम झाले. अचानक आलेल्या पावसामुळे लग्नसमारंभात चांगलीच तारांबळ उडाली. वळीवाचा पाऊस हा मान्सूनचा पाऊस वेळेत पडण्याचे संकेत असल्याचे बोलले जात आहे.

# एका आठवड्यासाठी आयपीएल स्पर्धा स्थगित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. इंडियन प्रीमियर लीगचा १८ वा हंगाम एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत वेळापत्रकातील बदल आणि उर्वरित सामन्यांचं आयोजन यासंदर्भातील परिस्थितीचं आकलन केल्यानंतर नवी माहिती दिली जाणार आहे. सर्व फ्रँचायजी आणि भागीदारांसोबत चर्चा केल्यानंतर स्पर्धा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. बीसीसीआयनं भारतीय सैन्यावर विश्वास दाखवत आणि सर्व घटकांच्या हितासाठी निर्णय घेण्यास कटिबद्ध असल्याचं सांगितलं.

बीसीसीआयनं या परिस्थितीमध्ये भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. आम्ही भारत सरकार आणि भारतीय सैन्याला पूर्णपणे समर्थन देतोय,असं त्यांनी म्हटलं. भारतीय सैन्यानं गेल्या २४ तासात पाकिस्तानकडून होत असलेल्या हल्लयांना नाकाम केलं आहे. भारतानं ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये ९ दहशतवादी हल्ला केल्यानंतर पाकिस्तान बिथरला आहे. पाकिस्ताननं भारताच्या १५ शहरांवर ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न केलाहोता.

दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील मॅच सुरक्षेच्या कारणामुळं रोखण्यात आली होती. मात्र, मॅच रोखण्याचं कारण बीसीसीआयनं तांत्रिक समस्या आणि वीज पुरवठा खंडित झाल्याचं दिलं होतं.

# साश्रुनयनांनी शहीद सचिन वनंजे यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले जवान सचिन यादवराव वनंजे यांचा देशसेवेच्या कर्तव्यावर असताना श्रीनगरच्या परिसरात दि. ६ मे रोजी अपघाती मृत्यू झाला होता. दि. ९ मे रोजी देगलूर येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात साश्रुनयनांनी त्यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, अधिकारी व मोठ्या नागरिक उपस्थित होते.

सचिन यांच्या निधनाची माहिती भारतीय सैन्यदलामार्फत त्यांच्या कुटुंबियांना मिळताच तालुक्यातील तमलूरसह देगलूरवर शोककळा पसरली. शहीद सचिन यांचे पार्थिव देगलूर येथील त्यांच्या राहत्या घरी पहाटे ४ वाजता दाखल होताच परिवारातील सदस्यांसह उपस्थितांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.

सकाळी ठिक ८.३० वाजता फुलांनी सजवलेल्या लष्कराच्या वाहनातून शहिद सचिन वनंजेच्या घरापासून अंत्ययात्रेला प्रारंभ झाला. शहरातील मुख्य मार्गाने नगरपालिका शेजारी असलेल्या मैदानात अंत्यविधीसाठी त्यांचे पार्थिव आणण्यात आले. यावेळी शहिद सचिन वनंजे, अमर रहे अमर रहे..च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी खासदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार जितेश अंतापूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार भरत सुर्यवंशी, गटविकास शेखर देशमुख, मुख्याधिकारी निलम कांबळे आदींसह आजी व माजी सैनिक आणि मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली व यावेळी मुख्यमंत्र्यांचा शोकसंदेश वाचुन दाखवण्यात आला. देगलूर नगरपालिका शेजारी तयार केलेले अंत्यविधीस्थळी भारतीय सैन्यदलाच्या पथकाने मानवंदना दिली. त्यानंतर शहीद सचिन वनंजेच्या पार्थिवावर अग्निसंस्कार करण्यात आले.

सचिन वनंजे सन २०१७ मध्ये भारतीय सैन्य दलात दाखल झाला होते. त्यांची पहिली पोस्टिंग सियाचीन भागात झाली. त्यानंतर जालंधर पंजाब येथे त्यांनी सेवा केली. गेल्या दीड वर्षापासून ते श्रीनगरमध्ये कर्तव्यावर होते. दरम्यान दि.६ मे रोजी वाहन दरीत कोसळून त्याचा मृत्यू झाला होता.





# 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान -१' पहिल्या आठवड्यात सुमारे ४०० कारवाया

## १ कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त





**नांदेड (प्रतिनिधी)–** दिनांक १ मे ते ३१ मे, २०२५ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान-१' चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पहिल्या आठवड्यात नांदेड परिक्षेत्रातील चार जिल्ह्यात सुमारे ४०० कारवाया करत १ कोटी २० लाख ७४ हजार ८३ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्याकामी व्यापक मोहिमेची आवश्यकता लक्षात घेऊन, दि.१ मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान-१'चे आयोजन करण्यात आले आहे. सदर मोहिमेत, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी झाले आहेत. त्याच प्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके ही देखील कारवाईत सहभागी झाली असुन, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर सक्तीने देखरेख ठेवली आहे.

या अनुषंगाने दि.१ मे ते दि.७ मे पावेतो नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्ह्यांत अवैध व्यवसायांविरोधात मटका/ जुगार, गांजा, अवैध दारु, वाळू व इतर संबधाने कारवाया करण्यात आल्या आहेत. यामध्ये नांदेड जिल्ह्यात ९७ गुन्हे दाखल करून ९८ आरोपींकडून ६ लाख ५ हजार ४७८ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासह परभणी जिल्ह्यात १०६ गुन्हे दाखल करून ११० आरोपींकडून ६० लाख १९ हजार ८१० रूपये, हिंगोली जिल्ह्यातून १०२ गुन्हे दाखल करून १०२ आरोपींकडून ३४ लाख २६ हजार ५९० रूपये आणि लातूर जिल्ह्यात ८९ गुन्हे दाखल करून ९१ आरोपींकडून २० लाख २२ हजार २०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. असा एकूण नांदेड परिक्षेत्रातील चार जिल्ह्यांतून ३९४ गुन्हे दाखल करून ४०१ आरोपींकडून १ कोटी २० लाख ७४ हजार ८३ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चालू महिन्यात दि. १ मे २०२५ ते दि. ७ मे रोजी पावेतो परिक्षेत्रात अवैध व्यावसायिकांचे विरुद्ध वरीलप्रमाणे एकूण (३९४) केसेस करण्यात आल्या असून एकूण १ कोटी २० लाख ७४ हजार ८३रुपयांचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली यांनी पोस्टे हट्टा हद्दीमध्ये गांजाची लागवड व साठवणूक विरोधात कारवाई करुन ८७ हजार रुपयांचा मुद्येमाल जप्त केला आहे. त्याचप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, परभणी यांनी देखील पोस्टे गंगाखेड परिसरातून ९५ हजार रुपयांचा (पान ६ वर...)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# वाढता उष्मा : संरक्षणाची जबाबदारी कोणाची?

यंदा उन्हाळा नेहमीपेक्षा आधीच पेटला आहे. एप्रिल महिन्यातच मध्य भारत, उत्तर भारत आणि काही पूर्व भारतातील भागात तापमानाने ४० अंश सेल्सियसचा टप्पा पार केला होता. गेल्या काही वर्षांत भीषण उष्णतेचे प्रमाण वाढले आहे आणि ही एक सातत्याने येणारी नैसर्गिक आपत्ती ठरत आहे. आधी फक्त राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि दिल्लीसारख्या भागांमध्ये उष्णतेचा परिणाम जाणवत असे; आता ही स्थिती ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही भागांपर्यंत पोहोचली आहे. अकोला सर्वाधिक तापलेले ठिकाण ठरले. येथे तापमान ४४.९ अंश सेल्सियसपर्यंत गेले. त्याच्या खालोखाल सोलापूर, परभणी, अमरावती आणि नंदुरबार अशा शहरांनाही उष्णतेचा तडाखा बसला. हवामान विभागाने आधीच उत्तर कोकण आणि विदर्भात भीषण उष्णतेच्या दिवसांची सुरूवात झाली असल्याचे जाहीर केले आहे आणि मे-जून महिन्यांत परिस्थिती अधिक बिकट होईल, असा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारांकडून उष्णतेच्या संकटाला गांभीर्याने न घेणे, ही गंभीर बाब आहे. परिणामी, न्यायालये आणि मानवाधिकार आयोगासारख्या संस्था यामध्ये सक्रियपणे पुढे आल्या आहेत. 'बीट द हीटवेव्ह अँड क्लायमेटिक चेंज वि. भारत सरकार' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने १७ एप्रिल रोजी स्पष्टपणे नमूद केले की, उष्णतेची लाट ही आता फक्त उन्हाळी बाब राहिलेली नसून ती जीवघेणी आपत्ती बनली आहे. आज अनेक गरीब, श्रमिक, बेघर आणि वयोवृद्ध नागरिक थेट उष्णतेच्या लाटांचा बळी ठरत आहेत. शहरी झोपडपट्ट्या, अनधिकृत वस्त्या किंवा रस्त्यावर जीवन जगणारे नागरिक अशा संकटांमध्ये अधिक असुरक्षित असतात. कोणतीही पूर्वसूचना प्रणाली नसल्यानं किंवा आरोग्यविषयक मार्गदर्शनाची अनुपस्थिती असल्यामुळे, त्यांचा जीव धोक्यात येतो. उष्णतेमुळे केवळ शरीराचे पाणी कमी होऊन थकवा किंवा उष्माघात होतो असे नाही; त्याचे परिणाम शेतमजुरांच्या उत्पन्नावर, कामगारांच्या आरोग्यावर, मुलांच्या शिक्षणावर आणि महिलांच्या कामावरही होतात. त्यामुळे हीट ॲक्शन प्लॅन्स म्हणजेच उष्णतेविरोधातील आराखडे केवळ शासकीय दस्ताऐवज न राहता, ते प्रभावी अंमलबजावणीच्या टप्प्यावर पोहोचले पाहिजेत. त्यामुळे त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना थंडाव्याची केंद्रे (कुलिंग सेंटर्स) स्थापन करणे, आरोग्यविषयक इशारे जाहीर करणे आणि गरजू व असुरक्षित लोकांसाठी त्वरित मदत यंत्रणा लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. भारतीय संविधानाच्या २१ व्या कलमानुसार 'जीवनाचा अधिकार' ही संकल्पना यात केंद्रस्थानी आहे. त्यामुळे ही न्यायालयीन भूमिका अत्यंत निर्णायक आणि मार्गदर्शक ठरते. मानवाधिकार आयोगानेसुद्धा ११ राज्यांना पत्र पाठवून मृत्यू टाळण्यासाठी पूर्वतयारीचे आदेश दिले आहेत. ही भूमिका उष्णतेच्या संकटाला केवळ हवामानशास्त्रीय बाब न मानता, मानवाधिकारांचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित करते. राजस्थान उच्च न्यायालयाने तर स्वतःहून (सुओ मोटो) या विषयाची दखल घेत राज्य सरकारला फटकारले आणि स्पष्ट केले की, नागरिकांना जनावरांप्रमाणे वागवता येणार नाही. हे वक्तव्य आपल्याला व्यवस्थेच्या असंवेदनशीलतेवर बोट ठेवते आणि जबाबदारीची जाणीव करून देते. या सर्व न्यायालयीन निर्देशांचा केंद्र आणि राज्य सरकारांवर नैतिक आणि घटनात्मक दबाव तयार होतो. केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता, दीर्घकालीन नियोजन गरजेचे आहे. क्लायमेट डाप्टेशन म्हणजेच हवामानातील बदलांना तोंड देण्यासाठी रचना करणे, ही आता प्रशासकीय सुधारणा, आरोग्य समता आणि मूलभूत पायाभूत सुविधांच्या आराखड्याशी जोडली पाहिजे. आज वेळ आहे ती परिस्थिती हाताबाहेर जाण्याच्या आधी काही ठोस उपाययोजना करण्याची. स्थानिक स्वराज्य संस्था, नागरी आरोग्य केंद्रे, अंगणवाडी केंद्रे आणि शाळा ही सर्व यंत्रणा यामध्ये सक्रिय सहभाग घेऊ शकतात. लोकांपर्यंत वेळेवर पाणी, थंड निवारा, प्राथमिक उपचार आणि आवश्यक माहिती पोहोचवणे हे किमान उपाय तातडीने राबवले पाहिजेत. त्याचबरोबर, हे दीर्घकालीन संकट समजून शहरी नियोजन, पायाभूत सुविधा, हरित क्षेत्रांचे संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये परिवर्तन घडवणे अनिवार्य आहे. उष्णता आता निसर्गदत्त अडचण राहिलेली नाही, ती सामाजिक अन्यायाची परीक्षा बनली आहे. आज देशातील न्यायसंस्थांनी आपले काम केले आहे, त्यांनी यंत्रणेला जागे केले आहे. आता ही जबाबदारी प्रशासनाची आणि राजकीय नेत्यांची आहे की, त्यांनी एकमेकांवर चिखलफेक करण्यात वेळ घालविण्यापेक्षा नियोजनबद्ध, सुसंगत आणि मानवी गरजांशी सुसंगत अशी यंत्रणा उभी करावी. कारण प्रत्येक नागरिकाचे जीवित आणि सन्मानाने जगण्याचे हक्क संविधानाने दिले आहेत आणि त्यांना संरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

# खरा तू आधार बन...!



जीवन जगताना नेहमी काय चुकले...? आणि ते कसे दुरुस्त करता येईल...? याचा विचार होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र कोणाचे चुकले...? आणि ते कसे सिद्ध करता येईल...? याचा प्रयत्न चालू असतो. प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्टीत प्रत्येकजण दुसऱ्याची चूक काढण्यामध्ये जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करतो. दुसऱ्याची चूक शोधूनही काढतो. जमेल त्या पद्धतीने झालेली चूक निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतो. वेळप्रसंगी ती चूक सिद्धही करतो. एवढा सर्व अट्टाहास करून दुसऱ्याला चुकीचा ठरवून दुसऱ्या बाजूला आपण बरोबर असल्याचे कळत नकळत घोषित करून टाकतो. पण प्रत्येकजण एक विचार पूर्णपणे विसरून जातो की, दुसऱ्याला चुकीचे ठरवून आपण बरोबर आहोत हे सिद्ध होत नाही. दुसऱ्याला लहान ठरवून आपण मोठे सुद्धा होऊ शकत नाही. माणूस म्हटले की, चुका होणारच. प्रत्येक माणूस चुकत असतो. फक्त झालेल्या चुकीतून शिकता आले पाहिजे...चूक स्वीकारली पाहिजे आणि झालेली चूक सुधारता आली पाहिजे. म्हणून केवळ चुका काढून बघत नाही तर त्या कशा सुधारता येतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

चुक प्रत्येकाची होते
आहे जन्म माणसाचा
नका शोधू कोणी चूक
शोधा उपाय हो त्याचा...
चुकीतून घेऊ बोध
करू दुरुस्ती नव्याने
पुन्हा नको चूक घडो
आता काळजी मनाने...

आपले संपूर्ण जीवन आपल्या सभोवती फिरत असते. आपल्या जीवनातला सर्वात महत्त्वाचा घटक आपण स्वतः असतो. आपल्यापेक्षा इतर कोणीही महत्त्वाचे नसते. हेच वास्तव आहे आणि हीच वस्तुस्थिती आहे. तरीही हे कोणी मान्य करत नाही. कोणी मान्य करो अगर ना करो...अटीतटीचा, आणीबाणीचा काळ आला की; स्वतः एवढे महत्त्वाचे कुणीच नाही. माणूस स्वतःपेक्षा जास्त कुणावरही प्रेम करत नाही. हे आपोआप सिद्ध होते. असे असले तरी माणसाला स्वतःला जगण्यासाठी आणि सुखी, समाधानी, आनंदी राहण्यासाठी सर्वांचीच गरज असते.

जीवनाचा अनुभव संपन्न सार सांगणारे आजी-आजोबा हवे असतात. जन्मदाते आई-वडील हवे असतात. प्रत्येकाला भाऊ-बहीण, मित्र-सवंगडी हेही आवश्यक असतात. आयुष्याला प्रत्येक सुखा-दुःखाच्या प्रसंगाला साथ-सोबत करणारा जीवनसाथी-जोडीदार हवा असतो. मुलगा-मुलगी, लेकरं-बाळ हवे असतात. असे बहरलेल्या गोकुळासारखे संपूर्ण परिपूर्ण कुटुंब हवे असते. या कुटुंबाच्या अनुषंगाने काका-काका, मामा-मामी, आत्या, मावशी यासारखे जीवाभावाचे सर्व नातेवाईक पाहिजे असतात. कुटुंबात, नात्यात, नातेवाईकात, आप्तस्वकीयात आणि मित्रपरिवारात सामंजस्य, एकमेकांना आधार देण्याची क्षमता, भावनिक ऊर्जा देण्याची ताकद, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा आपुलकी असणे महत्त्वाचे असते. तरच या सगळ्या नात्यांना अर्थ असतो. तर या सगळ्यांपासून आपल्याला आधार मिळतो. मानसिक बळ मिळते. कुटुंबाचा, नात्याचा माणसाला आधार वाटला पाहिजे. घरी आल्यानंतर तुम्हाला मनः शांती मिळावी. बाह्य जगातले सगळे ताण-तणाव आणि प्रश्न कितीही मोठे असले तरी ही माणसे माझी ऊर्जा स्थान आहेत यांच्यासाठी मला लढायचे आहे असे वाटले पाहिजे. समजा असे होत नसेल तर मात्र कुटुंबाच्या समस्या सुटता सुटत नाहीत. नात्यांचा गुंता वाढत जातो. कुटुंबात, नात्यात आक्रमकतेने प्रश्न सुटत नाहीत तर ते सामंजस्याने सुटतात. म्हणून इथे सामंजस्याची चढाओढ हवी. इथे स्वार्थाचा उपयोग नाही तर त्याग, समर्पणाची स्पर्धा असायला हवी.

प्रेम, जिव्हाळा, ममता
कुठे सहज मिळते
कष्टोनिया, झिजूनिया
माया लावावी लागते...
करा त्याग, समर्पण
स्वार्थ सोडावा लागतो
सामंजस्य ठेवा मनी
अर्थ नात्याचा कळतो...
करा आदर सर्वांचा
ठेवा नम्रता शब्दांत
खूप महत्त्वाचे सारे
माणसाच्या जीवनात...

खरेतर प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया, ममता, वात्सल्य या भावना सहज निर्माण होत नाहीत. त्या आपल्या वागण्या-बोलण्यातून निर्माण कराव्या लागतात. सुरुवात आपल्या स्वतःला करावी लागते. आपण सर्वां सोबत चांगले वागावे लागते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा प्रथमतः आपण आपल्या वागण्या-बोलण्यात प्रामाणिकपणे उतरवायचा असतो. तसे वागायचे असते.

एकमेकांविषयांचा आदर, एकमेकांची कदर करणे फार गरजेचे असते. आपण माया लावली तरच दुसरे लोक आपल्याला प्रेम, माया, आपुलकी आणि जिव्हाळा लावत असतात. तुमच्या स्वतःच्या वागण्यात, बोलण्यात जे असेल तेच समोरून आपल्याला मिळत असते. तुम्ही कसे आहात यावरून इतर लोक तुमच्या सोबत कसे वागतील हे ठरत असते. म्हणूनच म्हणतात...जशी दृष्टी तशी सृष्टी.

तुमची दुसऱ्यांना समजून घेण्याची वृत्ती असेल तर तुम्हाला मला समजून घ्या... म्हणण्याची आवश्यकता नाही. लोक तुम्हाला समजून घेता-तच. दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे आणि त्याच्या भूमिकेत शिरून ऐकून घेण्याची प्रवृत्ती तुमच्या अंगी असेल तर लोक तुम्हाला नेहमी आपुलकीने बोलतात. आपले दुःख, वेदना, आणि संवेदना सांगत असतात. तुमचा ऐकून घेण्याचा सुद्धा त्यांना आधार वाटत असतो. ज्यावेळी तुम्ही दुसऱ्याचे दुःख सम जून घेता. त्यावेळी समोरची व्यक्तीही तुमचे सुख-दुःख आणि वेदना समजून घेत असते. प्रत्येक वेळी प्रत्येक विषयावर आपण बोललेच पाहिजे किंवा आपले मत मांडलेच पाहिजे असे नसते. बराच वेळा दुसऱ्याचे मत समजून घेणे, दुसऱ्याच्या भावना समजून घेणे हेही फार महत्त्वाचे असते. प्रत्येक गोष्ट चूक किंवा बरोबर ठरवता येत नसते. प्रत्येक माणसाची धारणा आणि दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येकाची मते वेगवेगळी असतात. कोणत्याही प्रसंगावरून किंवा घडलेल्या घटनेवरून प्रत्येकाला वेगवेगळ्या भावना वाटू शकतात. प्रत्येकाने आपल्याच दृष्टीने बघावे हा अट्टाहास निरर्थक आहे. प्रत्येक बाबी, प्रसंग आणि गोष्टी सुद्धा व्यक्तिनिष्ठ असतात.

नका सांगू आपलेच
घ्यावे ऐकून सर्वांचे
सुख-दुःख प्रत्येकाला
मोल तेच वेदनेचे...

नेहमी आपल्या माणसांना भेटा, त्यांचे ऐकून घ्या. त्यांना समजून घ्या. तुम्हीही भरभरून बोला. एकमेकांशी सुसंवाद ठेवा. संवादातून गैरसमज करून घेऊ नका. एखाद्याचे आपल्याबद्दल बोलणे चुकले असेल तर त्याला संयमाने, शांतपणे तशी जाणीव करून द्या. समोरची व्यक्ती त्याची चूक नक्की सुधारेल फक्त प्रेमाने सांगून बघा. प्रत्येक बोलण्याचे-वागण्याचे संदर्भ वेगवेगळे असतात. प्रत्येक गोष्टीचा आपल्या परीने अर्थ काढून गैरसमज करून घेऊ नका. दुसऱ्याला नेमके काय सांगायचे आहे...? आपल्या कृतीतून काय सिद्ध करायचे आहे...? हे पूर्णपणे समजून घ्या. वरवर चुकीचा किंवा आपल्या सोयीचा अंदाज काढू नका.

घ्यावे समजून खरे
नको अंदाज उपरा
ऐक थोडे बोल काही
रिक्त मनाचा कोपरा...

प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा, सुख, समाधान, आनंद, दुःख, भीती, राग या मानवी मनाच्या सगळ्याच भावना बहुआयामी आहेत. या सर्व भावनांचे वेगवेगळ्या प्रसंगातील स्थान समजून घ्या. प्रसंगानुरूप आवश्यक आणि योग्य भावना प्रकट झाली पाहिजे. मुळात कोणतीच भावना वाईट नसते प्रसंगाशी, गोष्टीशी विसंगत भावना चुकीची ठरते. म्हणून प्रसंग आणि गोष्टी बारकाईने समजून घ्या. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रेम ही भावना विविध अंगी, व्यक्ती व नात्यापरत्वे वेगवेगळी आहे. प्रेमासारख्या व्यापक भावनेला बंदिस्त करू नका. प्रेमाचा एकाच अर्थाने विचार करू नका.

बऱ्याचशा गोष्टी गैरसमजातून उद्भवतात. म्हणून जीवन चांगल्या प्रकारे समजून घ्या. कधीच आणि कोणत्याच बाबतीत गैरसमज करू नका. छान, मोकळे, स्वच्छ आणि स्वच्छंदी जीवन जगा. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही. स्वतः आनंदात जगा आणि दुसऱ्यालाही आनंदात जगू द्या. छोट्या-छोट्या गोष्टीत अडकून पडू नका. हे जग फार विशाल आहे. जसे आपले अस्तित्व आणि व्यक्तिम त्व महत्त्वाचे आहे; तसे प्रत्येक माणसाचे अस्तित्व आणि व्यक्तिमत्व तेवढेच महत्त्वाचे आहे. एकमेकांच्या अस्तित्वाची, व्यक्तिमत्वाची, भावनांची, सुख-दुःखांची, कर्तुत्वाची कदर करायला शिका प्रत्येकाविषयी आदर बाळगा. एकमेकांविषयी सहानुभूती ठेवा. एकमेकांचा आधार बना.

नको होऊ खूप मोठा
नको जोडू फार धन
रंजल्यांचा गांजल्यांचा
खरा तू आधार बन....

या व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टीने जीवनाकडे बघा. फक्त लोकांच्याच चुका काढू नका. आपल्याही चुका शोधा आणि त्या सुधारा. म्हणून म्हणतोय विचार करताना...आपण चुकत आहोत का...?

**-मयूर जोशी,**
जिंतूर, जि. परभणी
मो. ७९७२३४४१२८

# उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती?



वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी.

मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत.

उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी.

सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फुर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# झाडे लावा आणि सुंदर जगा



माणसाला माणसाचं अस्तित्व या पृथ्वीवर टिकवून ठेवायचं असेल तर काही बाबींचं नियोजन करावंच लागेल जसे की सुंदर व सुदृढ जगण्यासाठी गरज असते ती चांगल्या व्यायामाची, अंग मेहनतीची, वर्तणुकीची, प्रेमळ भावनेची, निस्वार्थपणाची, नाते जपण्याची, एकमेकांतल्या उत्तम संवादाची, काही देणे लागते या उदात्त भावनेची. अन् चांगल्या प्रकारे जगण्यासाठी गरज असते ती म्हणजे शुद्ध हवेची.

पृथ्वीतलावरचा एकमेव हुशार असलेला प्राणी म्हणजे मानव आहे. पण मानवाच्याच हातून बरेचसे नुकसान होताना दिसत आहे. त्यातलेच एक म्हणजे कमी होत असलेले झाडांचे प्रमाण आहे.

खरंतर दिवसेंदिवस जिकडे तिकडे झाडेच झाडे दिसायला पाहिजे होते पण तसं दिसत नाही. उलट झाडांचे प्रमाण वाढण्यापेक्षा कमी होताना दिसत आहे. आणि यातूनच सध्या मानव आपलं कर्तव्य विसरून जात असल्याची भीती निर्माण होत आहे. म्हणून या हुशार माणसाने निसर्गाशी तितक्याच हुशारिणे माणसासारखं वागलं पाहिजे तर आणि तरच निरोगी व सुंदर जीवन जगता येईल.

जन्माला येणाऱ्या प्रत्येक माणसाने आपापल्या परीने चांगले कर्म करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातूनच काहीतरी देणे लागते या उद्देशाने काही न काही समाज हिताचे कामे केली पाहिजे. तसं तर मानवा सोबत निसर्गाची सेवा करायची असल्यास अनेक सेवा देण्याचे कार्य आहेत. कोणतेही एक चांगले काम हाती घेऊन पुढे जात राहिलं पाहिजे.

मानवाला धरतीवरती सुखा-ने जगायचं असल्यास काही गोष्टींचं नियोजन केलंच पाहिजे. त्यात सर्वप्रथम झाडे लाव-ली पाहिजे. नीट संगोपन करुन त्याला जगवले पाहिजे. कारण बऱ्याचदा असं होतं की, नुसते नावालाच झाडे लावले जातात, वास्तव वेगळेच असते. म्हणून थोडी जरा अधिकची काळजी घेतली तर या सिमेंटच्या जंगलामध्ये थोडी थोडी झाडांची सावली वाढली की माणसांच्या जीवासोबत अनेक जीवजंतू पशु-पक्षी वन्यप्राण्यांचे ही जीवन भरपूर सुंदर होते याची प्रचिती मिळते. मानवाला हवेची जितकी गरज आहे? त्याच्या कितीतरी पटीने गरज आहे ती म्हणजे झाडांची. कारण एक झाड अनेक गुणांनी समृद्ध असते. सर्वांच्या आरोग्यासाठी प्राणवायू देण-ारे व जीवन सुदृढ ठेवण्यासाठी वनस्पतींचा खजाना घेऊन उभे टाकलेले असते. त्यासोबतच झाडांच्या सावलीने जमिनीला थंडावा मिळतो. फळे मिळतात...

धरती आणि निसर्गाचं कालचक्र अबाधित ठेवण्यासाठी झाडं सतत प्रयत्नशील असतात. एक वेळ माणूस बदलेल पण झाड बदलत नाही. तसेच झाडांच्या निमित्ताने पाण्याची पातळी ही टिकून राहण्यास मदत होते असे म्हणतात.

लिहिण्याचे कारण असं की, उन्हाळा चालू आहे. उन्हाचा कडाका खूप वाढलाय. तापमान वाढीचे काम अधिक तीव्र होत आहे. उन्हाळ्यात पाण्याची बचत करण्यासाठी बऱ्याच जणांकडून प्रयत्न होत नाहीत. बऱ्याच ठिकाणी पाण्याची टंचाई दिसायला लागली. टंचाईग्रस्त भागात ज्यांना पाणी नाही असे लोक डोक्यावर घागरी घेऊन पायपीट करतात आणि ज्यांना ज्यांना मुबलक पाणी आहे असे लोक विनाकारण पाणी वाया घालतात. म्हणून या ठिकाणी लिहिण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. खरं तर मी तज्ञ नाही. मला अधिकची जाणीव नाही. तरीही थोडक्यात मनाला जे वाटते ते लिहिण्याचा प्रयत्न करावा वाटते. किमान प्रतिवर्षी प्रत्येकाने एक तरी झाड लावून त्याला वाढवले पाहिजे. मग तुम्ही कोणतेही औचित्य साधा, पण झाडे लावा. तुमचे एक झाड सर्वांचे रक्षण करण्यासाठी तत्परतेने आणि खंबीरतेने दंड थोपटून उभा असेल... तुमचं सुदृढ जीवन अबाधित ठेवण्यासाठी झाडांकडून खात्री नक्कीच पटेल. मग काय, कसला विचार करता? झाडे लावून सुंदर जगा. कारण या धरतीचे रखवाले तुम्हीच आहात.

**- गोविंद कवळे**
इळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

# महाराष्ट्र शासन आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यात सामंजस्य करार



**मुंबई-**उद्योग व्यवसायाचे सुलभीकरण (इज ऑफ डुईंग बिझनेस) आणि नागरिकांचे जीवन अधिक सोयीचे, सुरक्षित व सुलभ करण्याच्या उद्देशाने कायद्यामधील तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य करारावर विधी व न्याय विभागाचे सचिव सतीश वाघोले, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीचे अर्घ्य सेनगुप्ता यांनी स्वाक्षरी केली. याप्रसंगी विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीचे जीनाली दानी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देणारे कायदेमान्य वातावरण निर्माण व्हावे, उद्योग सुलभतेला गती मिळावी आणि उद्योग व्यवसायांच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करणारे कठीण आणि फौजदारी स्वरूपाच्या कायद्यांचे पुनरावलोकन करता यावे यासाठी 'डिक्रीमिनलायझेशन' करण्यात येणार आहे. यासाठी विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीकडून राज्यातील कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करून त्याचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाला सादर करण्यात येणार आहे.

## थोडक्यात...

### बंटी लांडगे यांना धम्मरत्न पुरस्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** फुले-शाहु-आंबेडकरी चळवळीचे युवा नेते, नेहमीच सामाजिक आणि धार्मीक कार्यात निस्वार्थपणे पुढाकार घेणारे युवा नेते बंटीभाऊ लांडगे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल अॅन्ड कल्चरल मुव्हमेंट च्यावतीने दिल्या जाणारा २०२५ चा धम्मरत्न पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. दि.१२ मे रोजी शहरातील महात्मा फुले पुतळा परिसरात आयोजित बुध्द पहाट या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार दिल्या जाणार आहे अशी माहिती आयोजक गजभारे यांनी दिली. युवा नेते बंटीभाऊ लांडगे यांना त्यांच्या कार्याची दखल घेवून यापुर्वीही अनेक सामाजिक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे याबद्दल त्यांना त्यांच्या मित्रपरिवारातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### १० वी व १२ वीतील गुणवंत पाल्यांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)–** मीमांसा फाऊंडेशन, दै. समीक्षा व मंथन क्रिएटीव्ह ग्रुपच्यावतीने इयत्ता १२ वी व इयत्ता दहावी परीक्षेत ८० टक्के व त्यावर गुण पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. वृत्तपत्र क्षेत्र व पोलीस दलातील कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या पाल्यांनी दि. १६ मे पर्यंत मो. ९४२२१७३७३५ या क्रमांकावर गुणपत्रिकेची प्रत टाकून नोंदणी करावी. तसेच दै. समीक्षा शिवाजीनगर नांदेड येथे गुणपत्रिकेची छायांकित प्रत आणून द्यावी. दहावीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १८ मे पर्यंत नोंदणीसाठी मुदत राहणार आहे. तरी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन संपादक रुपेश पाडमुख यांनी केले आहे.

# नांदेड जिल्ह्यातील २५९ शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू

**नांदेड (प्रतिनिधी) –** शिक्षकी जीवन संपूर्णपणे विद्यार्थ्यांच्या घडणुकीसाठी वाहून घेतलेल्या जिल्हा परिषदेतील २५९ शिक्षकांना अखेर न्याय मिळाला आहे. २००५ पूर्वी जाहिरात व अधिसूचना निघालेल्या, मात्र नियुक्ती १ सप्टेंबर २००५ नंतर झालेल्या या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी नुकतेच निर्गमित केले आहेत. यामुळे शिक्षक वर्गात आनंद व समाधानाचे वातावरण दिसून येत आहे.




हा निर्णय म्हणजे शिक्षकी जीवनातील निष्ठेचा, समर्पणाचा व न्यायाच्या प्रतीक्षेचा सन्मान आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाने हा विषय काटेकोरपणे हाताळला. सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी राघवेंद्र मदनुरकर, स्मिता पोपुलवार, मंगेश ढेंबरे व विक्रम रेनगुंटवार यांनी प्रभावी पाठपुरावा केला.

या निर्णयामुळे शिक्षकांना केवळ आर्थिक स्थैर्य मिळणार नाही, तर त्यांच्या सेवेचा सन्मानही होत आहे. अनेक शिक्षकांनी म्हटले, हा आमच्या शिक्षकी जीवनातील सर्वात मोठा निर्णय आहे. शिक्षकांनी हा निर्णय ऐतिहासिक ठरवत जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाचे विशेष अभिनंदन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थापन करण्याच्या मागणीसाठी मराठा मावळा संघाचे उपोषण




**किनवट (प्रतिनिधी)–** येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त असलेला पुतळा त्वरित बाहेर काढून सन्मानाने तो पुतळा स्थापन करा, या मागणीसाठी मराठा मावळा संघटनेच्यावतीने दि. ५ मे पासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा नगर परिषदेच्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी वाजत - गाजत आणून स्थापना करण्यासाठी बंदिस्त करून ठेवला आहे.या घटनेला किमान दोन वर्षाचा काळ लोटला असून, अद्यापही छत्रपती शिवाजी महाराजांचा उभारण्यात आला नाही. पुतळा स्थापन करण्यासाठी अनेकदा निवेदने, आंदोलने, उपोषण करूनही नगरपरिषदेने व तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी त्याकडे कानाडोळा केला.प्रशासनाच्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ व पुतळा स्थापन करण्याच्या मागणीसाठी मावळा मराठा संघटनेने दि. ५ मेपासून पालिका कार्यालयासमोर साखळी उपोषण आरंभिले आहे.पुतळा उभारण्यात येईपर्यंत साखळी उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार मावळा मराठा संघाने केला आहे.यासंदर्भात प्रशासनाला दिलेल्या निवेदनावर

संतोष चव्हाण अमोल कदम वैभव सूर्यवंशी यांच्या साक्षऱ्या आहेत.मावळा संघटनेच्या साखळी उपोषणास साहेबराव पवार,संभाजी ब्रिगेडचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालाजी पाटील सिरसाट तालुकाध्यक्ष सचिन पाटील कदम,गोविंद आरसोड, सुमित माने,गोविंद देवडे यांच्यासह अनेक संघटनानी व शिवभक्तांनी पाठिंबा दिला आहे.

# रुद्र हेमंत पाटील याचे अमेरिकेत एम.एस.मास्टर पदवी परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** रुद्र राजश्री हेमंत पाटील याने अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सेक्रेड हार्ट युनिव्हर्सिटी मधून मास्टर ऑफ सायन्स, इन फायनांस अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंटच्या दोन वर्षाच्या कोर्स पूर्ण केला. त्याने विशेष प्राविण्य मिळविले असून त्याला मान्यवरांच्या हस्ते एम. एस.डिग्री प्रदान करण्यात आली.

रुद्र पाटील हे नामदार हेमंत पाटील व सामाजिक कार्यकर्त्या तथा गोदावरी उद्योग समूहाच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांचा पुत्र आहे. हा पदवीदान समारंभ सोहळा नुकताच अमेरिकेत संपन्न झाला. या सोहळ्यास रूद्रचे आई वडील राजश्री पाटील व हेमंत पाटील हे मुलाचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी विशेष करून उपस्थित होते. हेमंत पाटील व राजश्री पाटील हे सर्व सामान्य कुटुंबातून आलेले जोडपे असून सेवा संघाच्या माध्यमातून दोघांच्याही सामाजिक कार्याची सुरवात एकदाच झाली. मूळ सामाजिक पिंड असलेले ही जोडी पुढे राजकारणात आली आणि शिवसेनेच्या माध्यमातून आजतागायत यशस्वीपणे राजकारण आणि समाजकारण करीत आहेत.त्यांनी आपला सामजिक वसा रुद्र पाटील याला



दिला आहे. तसेच त्यांच्या संस्काराच्या जडणघडणीतून तो वाढला आहे. रुद्र पाटील देखील हा सामाजिक वारसा जपतील असा विश्वास आहे. गोदावरी अर्बन मल्टीस्टेट चे काम लहानपणापासून बघत असल्यामुळे या माध्यमातून हजारो लोकांना आपण थेट लाभ मिळवून देऊ शकत असल्याने भविष्यातील या क्षेत्रातील संभाव्य संधी ओळखून या विषयात आपसूकच रुची निर्माण होऊन रुद्र पाटील याने उच्च शिक्षण घेतल्याचे सांगितले. रुद्र पाटील याचे प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण किड्स किंगडम तसेच नागार्जुना पब्लिक स्कूल नांदेड मध्ये झाले. बारावी यशवंत कॉलेज नांदेड येथून पूर्ण केले. बॅचरल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज हे पदवीचे शिक्षण विल्सन कॉलेज मुंबई येथे केले आहे. रुद्र पाटील यांच्या या यशाबद्दल त्यांचे कुटुंबीय, गोदावरी परिवाराच्या वतीने तसेच विविध राजकीय तथा सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांना भुर्दंड नको, विहिरीना संरक्षण भिंती शासनाने स्वखर्चाने कराव्यात –प्रल्हाद इंगोले

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्य रस्त्या लगत असलेल्या शेतकऱ्यांच्या विहिरींना शासनाने स्वखर्चाने संरक्षण भिंती बांधून द्याव्यात. विहिरी वर्षानुवर्षापासूनच्या आहेत. रस्ते नंतर झालेत. त्यामुळे होणाऱ्या किंवा झालेल्या अपघातास शेतकऱ्यास कारणीभूत न धरता त्यांच्यावर आर्थिक भुर्दंड न टाकता संबंधित विभागाच्या मार्फतच रस्त्यालगतच्या विहिरींना संरक्षण भिंती बांधून द्याव्यात, अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रल्हाद इंगोले यांनी केली आहे.



चिखली (जि.नांदेड) येथे ट्रॅक्टर विहिरीत कोसळून सात महिला ठार झाल्याच्या घटनेनंतर मुख्य रस्त्यालगतच्या विहिरींना शेतकऱ्यांनी संरक्षण भिंत बांधावी असे पत्र जिल्हाधिकारी नांदेड यांनी काढले. ते शेतकऱ्यावर अन्यायकारक असून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने शेतकऱ्यांना स्वखर्चाने विहिरींना संरक्षण भिंती बांधणे शक्य नाही. ग्रामीण भागातल्या विहिरी या अनेक वर्षापासूनच्या आहेत रस्ते नंतर झाले. काही रस्त्यांचं विस्तारीकरण झालं. त्यामुळे होणाऱ्या किंवा झालेल्या अपघातात शेतकऱ्यांना जबाबदार धरता येणार नाही. त्यात गेल्या अनेक वर्षापासून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे कोण्याही शेतीमालाला योग्य भाव नाही, वेळेवर पिक विमा नाही, नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाली तरी योग्य भरपाई नाही. त्यामुळे संसाराचा गाडा हाकणे शेतकऱ्यांना शक्य होत नाही म्हणूनच शेतकरी आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकांनी शेती करणे ही सोडून दिले आहे त्यात स्वखर्चाने विहिरींना संरक्षण भिंती बांधा म्हणणे हे शेतकऱ्यावर अन्यायकारक होईल. शासनाने अशा प्रकारचे अपघात झाल्यानंतर मृतांच्या नातेवाईकांना मदत करण्यापेक्षा स्वतः सर्वे करून रस्ते महामंडळ, बांधकाम विभाग, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मदत व पुनर्विकास किंवा अन्य संबंधित खात्यामार्फत रस्त्यालगतच्या विहिरींना संरक्षण भिंती बांधून द्याव्यात, अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रल्हाद इंगोले यांनी शासनाकडे केली आहे.

# दुचाकी चोरांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात; विविध ठिकाणी चोरलेल्या सहा दुचाकी जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात दुचाकी चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांच्या टीमने या टोळीतील दोघांना अटक केली. तसेच त्यांच्याकडून दोन लाख तीस हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी जप्त केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत शहर व जिल्हाभरात चोरटे, गुन्हेगार, समाजकंटक यांच्या मुसक्या आवळण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. दुचाकी चोरीचे गुन्हे उघड करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे



पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना दिल्या. त्यावरून खंडेराय यांनी आपले सहकारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांच्या पथकाला कार्यरत करून सूचना दिल्या. रवी वाव्हुळे यांनी गुप्त माहिती काढून विशाल मधुकर डोलारकर (वय २७ राहणार लंगडेगल्ली अर्धापूर) आणि जुबेर खान आमिर खान (वय ३२ राहणार मदिनानगर अर्धापूर) या दोघांना संशयावरून ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी दुचाकी चोरी केल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यांना अधिक विश्वासात घेऊन माहिती घेतली असता वजिराबाद, बारड, अर्धापूर, आणि हट्टा जिल्हा हिंगोली या ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. एवढेच नाही तर सहा वेगवेगळ्या कंपनीच्या दुचाकी गाड्या पोलिसांनी या दोघांकडून जप्त केल्या. पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे यांच्या फिर्यादीवरून वरील दोघांविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी दोन्ही चोरट्यांना वजिराबाद पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

## संतोष अर्धापुरे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** डोंगरकडा येथील संतोष भोजप्पा अर्धापुरे (वय ३५ ) यांचे दि. ८ मे २०२५ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. संतोष अर्धापुरे यांच्यावर दुपारी १२ वाजता डोंगरकडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तरुण वयातच निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई, बहीण, भाऊ असा परिवार आहे.

## विमलबाई कानोले यांचे निधन



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** जिगळा (ता. बिलोली) येथील विमलबाई विठ्ठलराव कानोले (माली पाटील) (वय ७५) यांचे ९ मे रोजी पहाटे निधन झाले. शुक्रवारी दुपारी चार वाजता जिगळा (ता. बिलोली) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सुना, नातू, नाती असा परिवार आहे. भुजंग विठ्ठलराव कानोले पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

## भारताचा विजय होण्यासाठी सोमवारी महादेवाला जलाभिषेक

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत पाकिस्तान युद्ध जोरात सुरू आहे. यात भारताला विजयश्री मिळावी यासाठी सोमवार दि.१२ मे रोजी दुपारी ३ वाजता भाजपातफे महादेवाला जलाभिषेक करून साकडे घालण्यात येणार असल्याची माहिती अॅड. दिलीप ठाकूर व सुरेश लोट यांनी दिली आहे.

गोवर्धन घाट परिसरात जागृत देवस्थान असणारे सिद्धेश्वर महादेव मंदिर या ठिकाणी दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात. गेल्या ९९ आठवड्यापासून दर सोमवारी संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. येत्या सोमवारी १०० वा महाप्रसाद आहे. तत्पूर्वी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, भाजपा मराठवाडा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे व ड.किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महा जलाभिषेक करण्यात येणार आहे. राष्ट्रप्रेमी नागरिकांनी महाभिषेक मध्ये सहभाग घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य अॅड. दिलीप ठाकूर व भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांनी केले आहे.

## यंदा कुसुम सभागृहात रंगणार बुद्ध पहाट संगीतमय भीमगीत गायनाचा कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी) –** तथागत भगवान बुध्दांच्या २५८८ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र बहुजन शिक्षक महासंघ, नांदेडच्यावतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी येत्या सोमवार दि.१२ मे रोजी अर्थात बुध्द पौर्णिमेच्या दिवशी सकाळी पाच वाजता शहरातील कुसुम सभागृह येथे सुप्रसिध्द गायक चेतनकुमार चोपडे प्रस्तुत् तुझ्या पाऊल खुणा भीमराया या बुध्द भिम गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



तथागताच्या धम्माचे चक्र गतीमान करण्यासाठी भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र बहुजन शिक्षक महासंघ, नांदेडच्यावतीने मागील १६ वर्षांपासून वैशाख पौर्णिमेला बुध्द पहाट या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षी कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या बुध्द पहाट या संगीतमय कार्यक्रमाच्या प्रारंभी पुज्य भदंत पय्याबोधी थेरो यांचा धम्म देशनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध गायक चेतनकुमार चोपडे आणि त्यांचा संच प्रस्तुत् तुझ्या पाऊल खुणा भीम राया या बुध्द भिम गीत गायनाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. तरी बौद्ध उपासक आणि उपासिकांनी पांढरा शुभ्र पोशाख परिधान करून उपस्थित राहून कुशल कर्म संपादित करावे, असे आवाहन संयोजक रोहिदास कांबळे आणि टी.पी.वाघमारे यांनी केले आहे.

# सिडको येथील कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालयाचे यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे बारावी बोर्डाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल लागला असून कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालयाचा आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत ९०.२४ टक्के निकाला लागला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९६.५७ टक्के तर कला शाखेचा निकाल ८०.२१ टक्के लागला. एकूणच कुसुमताई विद्यालयाचा निकाल ९०.२४ टक्के लागला असून पुन्हा एकदा सिडको हडको परिसरात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी कु.प्रतीक्षा मुंडे ८७.८५ टक्के मार्क घेऊन विद्यालयात प्रथम तर अक्षय शिंदे यांनी ८७.६५ टक्के मार्क घेऊन द्वितीय आणि वर्धित शिंदे ८४.१७ टक्के मार्क घेऊन तृतिय आला आहे. विज्ञान शाखेतून ८ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह व ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच कला शाखेचा १ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह तर १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व गुणवंतांचे संस्थेचे सचिव संभाजी बिरादार व प्राचार्य शशिकला जाधव तसेच सर्व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नांदेड-औरंगाबाद, औरंगाबाद-तिरूपती गाड्यांमध्ये दोन डब्यांची कायमस्वरूपी वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळ्यात होणारी प्रवाशांची गर्दी पाहता दक्षिण मध्य रेल्वे ने नांदेड संत्रागाची - नांदेड एक्स्प्रेस आणि नांदेड औरंगाबाद - नांदेड एक्स्प्रेस आणि औरंगाबाद तिरुपती औरंगाबाद एक्स्प्रेस मध्ये दोन डब्यांची वाढ कायम स्वरुपात करण्याचे ठरविले आहे.



दोन डब्यांची वाढ पुढील प्रमाणे आहे. गाडी क्रमांक १२७६७ / १२७६८ हजूर साहिब नांदेड संत्रागाची हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसमध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत आणि एक द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) असे दोन डब्बे हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १२ मे २०२५ पासून आणि संत्रागाची येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १४ मे २०२५ पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

गाडी क्रमांक १७६२० / १७६१९ हजूर साहिब नांदेड औरंगाबाद हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसमध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत आणि एक द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) असे दोन डब्बे हजूर साहिब नांदेड येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १६ मे २०२५ पासून आणि औरंगाबाद येथून सुटणाऱ्या गाडीत दि.१८ मे २०२५ पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत. या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

गाडी क्रमांक १७६२१ / १७६२२ औरंगाबाद तिरुपती औरंगाबाद एक्स्प्रेस मध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत आणि एक द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) असे दोन डब्बे औरंगाबाद येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १६ मे २०२५ पासून आणि तिरुपती येथून सुटणाऱ्या गाडीत दि. १७ मे २०२५ पासून कायम स्वरुपात वाढविण्यात आले आहेत, या वाढी नंतर या गाडीत डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

## ग्रामीण भागातील ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करावी; मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांमधे गोंधळ निर्माण करणारी आहे. त्यामुळे ही प्रवेश पद्धत रद्द करावी करावी, अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शालांत प्रमाणपत्र परीक्षा संपन्न झाल्या नंतर राज्यातील ग्रामीण भागातील ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांना या प्रक्रिये विषयी माहिती नाही. कोणतीही पूर्व तयारी न करता घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ उडून प्रवेश प्रक्रिया बाधित होणार आहे. अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतील.तर अनेक उच्च माध्यमिक शाळेत ११ वीसाठी पुरेसे प्रवेश होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. ११ वी प्रवेश प्रक्रियेत होणारा गोंधळ टाळण्यासाठी या वर्षीची राज्यातील ग्रामीण भागातील ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्यात यावी. पुरेशी तयारी व जागृती करूनच ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष औताडे ए. बी., सहसचिव रेखा सोळंके, सचिव आर. के. वाकोडे, ई. डी. पाटोदेकर, जी. पी.कौसल्ये, आनंद मोरे आर. पी वाघमारे, डी. बी. नाईक अब्दुल हसीब,राम येडते, बाबुराव घाटे, मोहन पिनाटे, व्यंकटराव हुलगुंदे यांनी केली आहे.


# आर्य वैश्य परिवार मंडळ कौठा यांच्यावतीने आयोजित शोभायात्रेत थंड पेय वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** आर्य वैश्य परिवार मंडळ कौठा तथा माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सव समितीच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत कौठा नगरीतील माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद धोंडीबाराव काकडे यांच्या वतीने फटाक्यांचा आतिषबाजीमध्ये स्वागत करून पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच थंड पेय वाटप करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे व गणेश काकडे यांच्या वतीने कौठा येथील निवासस्थानी मिरवणुकीतील सहभागी समाजबांधवांना थंड मठ्ठा पेय वाटप करण्यात आले.

यावेळी आर्य वैश्य समाजाचे लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिव रितेश अंमीलकंठवार, कोषाध्यक्ष सचिन काशेटवार, शाम पेनसलंवार, बालाजी येरावार, गजानन चिद्रवार यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर माता वासवी यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन केले. फटाक्यांच्या आतषबाजीत शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी उत्तम वरपडे, गंगाबिशन कांकर, प्रशांत धमलवार, नरेश लालवाणी, व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# आयसी-८१४ अपहरणापासून ते संसदेवरील हल्ल्यापर्यंत...

# कोण आहे रऊफ?

**भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानमध्ये अनेक दहशतवादी मारले गेले. या दहशतवाद्यांमध्ये अब्दुल रऊफ अझहरचाही समावेश असल्याचा दावा करण्यात येत आहे. रऊफने अनेक दशके भारतात दहशतवादी घटनांचा कट रचला आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतीचे जाळे वाढवले. त्याला मारून भारतीय सैन्याने जैश-ए-मोहम्मदचे कंबरडे मोडले आहे.**




## रऊफ अझहर कोण होता?

अब्दुल रऊफ अझहर उर्फ मुफ्ती अझहर आणि सादा बाबा हा पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद (जेईएम) चा मुख्य कमांडर होता. तो जैश-ए-मोहम्मदचा संस्थापक आणि कुख्यात दहशतवादी मसूद अझहरचा धाकटा भाऊ होता. रऊफचा जन्म १ जानेवारी १९७७ रोजी पाकिस्तानमध्ये झाला. २००७ मध्ये जेव्हा मसूद अझहर भूमिगत झाला तेव्हा रऊफने दहशतवादी संघटनेची कमान हाती घेतली आणि भारतासह अफगाणिस्तानात दहशतवादी नेटवर्क मजबूत करण्यात मोठी भूमिका बजावली.

## तो कसा मारला गेला?

७ मे २०२५ रोजी भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी छावण्यांवर हवाई हल्ले केले. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदच्या मुख्यालयावरही हल्ला करण्यात आला. १५ एकरमध्ये पसरलेल्या मरकझ सुभान अल्लाहवरील कारवाईत रऊफ अझहर मारला गेल्याचा दावा करण्यात आला आहे.

## जगाच्या नजरेत रऊफ काय?

भारताने २७ ऑक्टोबर २०२० रोजी रऊफला UAPA अंतर्गत दहशतवाद्यांच्या यादीत समाविष्ट केले. इंटरपोलने २००० पासून रऊफविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती. २०१० मध्ये, त्याला अमेरिकेने अधिकृतपणे जागतिक दहशतवादी घोषित केले.

## पत्रकार पर्लशी काय संबंध होता?

अमेरिकन पत्रकार डॅनियल पर्ल २००२ मध्ये पाकिस्तानातील बहावलपूर येथे गेले होते, जिथे त्यांचे दहशतवाद्यांनी अपहरण करून निर्घृण हत्या केली. या प्रकरणात रऊफच्या संघटनेने मोठी भूमिका बजावली. डॅनियल पर्लची सहकारी आसरा नोमानी हिने भावनिक निवेदनात भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. RAIR फाउंडेशनच्या संस्थापक अमेरिकन कार्यकर्त्या एमी मॅक यांनीही भारताचे कौतुक केले आहे आणि त्याला न्याय म्हटले आहे.

## रऊफ कोणत्या हल्ल्यांमध्ये सहभागी होता?

- IC-814 अपहरण: २४ डिसेंबर १९९९ रोजी, नेपाळची राजधानी काठमांडू येथून इंडियन एअरलाइन्सच्या विमानाचे अपहरण करण्यात आले आणि ते अफगाणिस्तानातील कंधार येथे नेण्यात आले. ही दहशतवादी घटना हरकत-उल-मुजाहिदीनच्या दहशतवाद्यांनी घडवून आणली आणि अपहरणाची योजना रऊफने आखली होती, ज्याच्या बदल्यात भारताला तीन धोकादायक दहशतवाद्यांना सोडावे लागले. या दहशतवाद्यांमध्ये उमर सईद शेखचाही समावेश होता, ज्याने नंतर अमेरिकन पत्रकार डॅनियल पर्लचे अपहरण करून शिरच्छेद केला.
- भारतीय संसदेवर हल्ला : १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर झालेल्या हल्ल्याच्या कटातही रऊफचा सहभाग होता. या हल्ल्यामुळे भारत- पाकिस्तान संबंधांमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला.
- पठाणकोट एअरबेस हल्ला : २ जानेवारी २०१६ रोजी भारतीय हवाई दलाच्या तळावर हल्ला करण्याच्या कटातही रऊफचे नाव पुढे आले. या घटनेत अनेक सैनिक शहीद झाले.
- इतर हल्लेः गुरुदासपूरच्या कठुआ, सांबा, तंगधार आणि दिनानगर येथील लष्करी चौक्या आणि पोलिसांवरील हल्ल्यांमध्येही रौफची भूमिका आहे.

## फक्त S-400 नाही, ६ संरक्षण प्रणालींबद्दल जाणून घ्या, ज्यांनी जम्मू ते गुजरातपर्यंत पाकिस्तानला त्यांची मर्यादा दाखवली!


- एल-७० गन : स्वीडिश कंपनी बोफोर्सने बनवलेली ४० मिमी विमानविरोधी गन. या गन हवाई लक्ष्यांवर जलद हल्ला करण्यास सक्षम आहेत. भारताने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या गन आणखी सुधारल्या आहेत.
- Zu-23 mm सिस्टम : सोव्हिएत काळातील या विमानविरोधी गनमध्ये दोन बॅरल आहेत. त्या वापरण्यास सोप्या आहेत. कमी उंचीवर उडणाऱ्या लक्ष्यांना लक्ष्य करण्यात त्या प्रभावी आहेत. या गन रडार आणि ऑप्टिकल टार्गेटिंग सिस्टमशी देखील जोडल्या जाऊ शकतात.
- शिल्का सिस्टीम : ही रडार-मार्गदर्शित स्वयंचलित विमानविरोधी शस्त्र प्रणाली आहे. यात चार २३mm ऑटो कॅनन आणि रडार सिस्टम आहे. ही प्रणाली एकाच वेळी अनेक हवाई लक्ष्यांचा मागोवा घेऊ शकते आणि त्यांना नष्ट करू शकते. भारतीय सैन्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिल्का प्रणालीमध्ये बदल केले आहेत.
- काउंटर-यूएएस सिस्टीम : ड्रोन आणि इतर मानवरहित हवाई प्रणालींपासून असलेला धोका लक्षात घेता, भारताने काउंटर-यूएएस सिस्टीम्सदेखील तैनात केल्या आहेत. या प्रणालींमध्ये रडार आणि इलेक्ट्रो-ऑप्टिकल सेन्सर्स आहेत जे ड्रोन शोधतात.
- एस-४०० सुदर्शन चक्र : एस-४०० ही रशियाकडून खरेदी केलेली हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आहे. भारतात त्याला 'सुदर्शन चक्र' असे नाव देण्यात आले आहे. सुदर्शन चक्र हे नाव महाभारतावरून आले आहे. एस-४०० ही प्रणाली ४०० किलोमीटरपर्यंतच्या हवाई लक्ष्यांवर मारा करू शकते. ते ६०० किलोमीटर अंतरावरून धोका ओळखू शकते.



# दहशतवादाची पायाभूत सुविधा नष्ट, आयएसआयला मोठा धक्का...

**पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादाच्या पायाभूत सुविधांचे झालेले नुकसान पाहता ऑपरेशन सिंदूरचे महत्त्व मोठे मानले जात आहे. अत्यंत अचूक गुप्त माहितीच्या आधारे हे दहशतवादी अड्डे हवाई हल्ल्यासाठी निवडण्यात आले होते आणि ते पूर्णपणे नष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मद आणि मुरीदकेमधील लष्कर-ए-तैयबाच्या मुख्यालयांचा समावेश आहे.**

“ आतापर्यंत भारत त्यांच्याविरुद्ध थेट कारवाई करण्यास संकोच करत होता. यावेळी तो संकोच तुटला. भारतीय सैन्याने केवळ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले नाहीत तर दहशतवादी कट रचण्याची त्यांची क्षमताही कमकुवत केली आहे. हे भारताच्या दहशतवादाविरुद्धच्या धोरणात एक मोठा आणि निर्णायक बदल दर्शवते.



# पाकिस्तानला खूप महागात पडू शकते भारताशी युद्ध!

- लक्ष्य काय असेल? : भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला. यानंतर, ७ मे च्या रात्री पाकिस्तानने भारताच्या उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील शहरांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली, जी भारताने S-400 क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीने हाणून पाडली. एवढेच नाही तर भारताने पाकिस्तानच्या काही हवाई संरक्षण प्रणालीही नष्ट केल्या आहेत.
- दीर्घकालीन परिणाम : ऑपरेशन सिंदूर ही एक वेगळी घटना म्हणूनही पाहू नये. भारताने अलिकडेच जी कठोर पावले उचलली, त्याचाच हा एक भाग मानला पाहिजेत. विशेषतः सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय, याचा पाकिस्तानच्या शेती आणि अन्न सुरक्षेवर दीर्घकालीन परिणाम होईल.
- मानसिक परिणाम : मुरीदके आणि बहावलपूरमधील दहशतवादी तळांवर झालेला हल्ला हा पाकिस्तानी लष्कर, आयएसआय आणि दहशतवादी संघटनांना मोठा धक्का आहे. ऑपरेशन सिंदूरचा मानसिक परिणामदेखील होतो. हे दोन्ही अड्डे दशकांपासून दहशतवादाचे केंद्र आहेत आणि येथेच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी भारताविरुद्ध कट रचत होते.
- मर्यादित पर्याय : ऑपरेशन सिंदूरनंतर, पाकिस्तानी सैन्य आणि त्यांच्या गुप्तचर संस्थेवर दबाव होता. म्हणून, ७ मेच्या रात्री, त्यांनी भारतीय शहरांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. खरं तर, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. पाकिस्तानी सैन्याने ऑपरेशन सिंदूरला प्रत्युत्तर म्हणून जो भ्याड हल्ल्याचा प्रयत्न केला त्यातही त्यांच्या नशिबी हार आली.

### वास्तव उघड

जेव्हा पाकिस्तान म्हणतो की त्यांचा दहशतवादासोबत काहीही संबंध नाही, तेव्हा फार कमी देश त्यावर विश्वास ठेवतात. इस्लामाबादचे सत्य संपूर्ण जगासमोर उघड झाले आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ आणि बिलावल भुट्टो यांच्या अलीकडील विधानांवरूनही त्यांचा देश दहशतवादाला पाठिंबा देत असल्याचे सिद्ध होते. आंतरराष्ट्रीय समुदाय पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला कंटाळला आहे. म्हणूनच चीन आणि तुर्की वगळता इतर कोणताही देश पाकिस्तान काय म्हणतो याकडे लक्ष देऊ इच्छित नाही. पारंपरिक आखाती मित्र राष्ट्रांनीही आता भारताच्या दृष्टिकोनातून प्रादेशिक सुरक्षेला समजून घेण्यास सुरुवात केली आहे.

भारताने आधीच सांगितले होते की अशा कोणत्याही कृतीला ते योग्य उत्तर देईल आणि तेच घडले.

- दहशतवादाचा वापर : तथापि, पाकिस्तान पुन्हा दहशतवादाचा अवलंब करू शकतो. त्यांच्यासाठी जम्मू आणि काश्मीर किंवा भारतातील इतर राज्यांमध्ये दहशतवादी कारवाया करणे हा एक सोपा पर्याय आहे. पण, यात सर्वात मोठा धोका असा आहे की यामुळे पुन्हा एकदा जगाला हे सिद्ध होईल की पाकिस्तान हा दहशतवादाचे केंद्र आहे.
- जिहादी धोका : पाकिस्तानच्या सत्तेला दहशतवादाचा वापर करण्याची सवय झाली आहे. त्यांनी ही रणनीती अफगाणिस्तान तसेच भारताविरुद्ध वापरली. तथापि, या बाबतीत एक चिंता अशी आहे की जेव्हा दहशतवादाचे प्रशिक्षण घेतलेल्या या जिहादींना काम मिळणार नाही, तेव्हा ते पाकिस्तानमध्येच हल्ले करू लागतील. तहरीक-ए-तालिबानचे उदाहरण आपल्यासमोर आहे, ज्यामुळे पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांचे जीवन कठीण झाले आहे.
- दहशतवादाचा राक्षस : १९८० च्या दशकात पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयने अफगाण मुजाहिदींना आश्रय दिला. त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आणि त्यांना शस्त्रे देण्यात आली. नंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशत पसरवण्यासाठी हेच मॉडेल वापरले गेले. पाकिस्तानने त्यावेळी जो राक्षस उभा केला, तो तोच पाकला गिळायला ठाकला आहे. जर त्यांनी वेळोवेळी वाढवलेल्या दहशतवाद्यांना बाहेर काढले नाही तर तेच पाकचा नाश करतील. यामुळेच पाकिस्तानमधून होणारा दहशतवाद संपूर्ण जगासाठी एक समस्या बनला आहे. पाकिस्तानातील एबटाबाद या लष्करी तळावर ओसामा बिन लादेनचा शोध लागणे, ही बाब तेथील दहशतवादी रचना किती मजबूत आणि खोलवर रुजलेली आहे याचा एक भक्कम पुरावा आहे.

# Opinion : जगाने काढून घेतला पाठिंबा; दुष्कृत्यांमुळे पाकिस्तानचा ऑपरेशन सिंदूरमध्ये होईल नाश!!

**पहलगाममधील दहशतवादी घटनेला आपण जबाबदार नसल्याचे पाकिस्तान सातत्याने सांगत आहे. पण, यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. त्यामुळे पाकिस्तानने एक नवीन पद्धत अवलंबली. पाकिस्तानने म्हटले, की पाश्चात्य देशांच्या सांगण्यावरून आम्ही जिहादी घटकांना प्रोत्साहन दिले होते. पण, ते आता बंद केले आहे. आता आम्ही स्वतःच दहशतवादाचा बळी ठरत आहोत... पण जग पाकिस्तानच्या या सांगण्यावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. ऑपरेशन सिंदूरनंतर जगातील बहुतेक देशांमध्ये अशी भावना आहे, की २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यावर भारताचा राग योग्य आहे. पाकिस्तानचे दावे आणि वास्तव यात खूप फरक आहे; आणि हेच त्यांच्या विनाशाचे कारण बनत आहे...**

### पाक खोटारडा असल्याचे सिद्ध

पाकिस्तान हा जगभर खोटारडा देश म्हणून सिद्ध झाला आहे. १९४७-४८ मध्ये आदिवासींच्या नावाखाली काश्मीरमध्ये सैन्य घुसवण्याचा प्रयत्न असो किंवा कारगिलमधील भारतीय चौक्यांवर आपले सैन्य तैनात करण्याचे धाडस असो, जगाला त्यांच्या दुष्कृत्यांची जाणीव आहे. त्याचप्रमाणे, मुंबई हल्ल्यातील गुन्हेगार अजमल कसाब हा पाकिस्तानी होता हे नाकारण्यात आले, परंतु ते खोटेही पकडले गेले. ओसामा बिन लादेनचा शोध घेण्यासाठी अमेरिकेने एक दशकाहून अधिक काळ घालवला; आणि तोही पाकिस्तानात आश्रय घेताना आढळला. हेच कारण आहे की तो पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना आपले मानण्यास नकार देत आहे, परंतु जग त्याच्यावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. आजची वास्तविकता अशी आहे की तुर्की आणि अझरबैजान या दोन मुस्लिम देशांचा अपवाद वगळता, आखातातील प्रमुख देशही भारताविरुद्ध पाकिस्तानला पाठिंबा देण्यास तयार नाहीत. दहशतवादाच्या मुद्द्यावर इराण आणि सौदी अरेबियासारखे देश भारतासोबत उभे आहेत.

### भारताकडून आपल्या हितांचे रक्षण

ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या उद्देशाने होते. भारताने असेही म्हटले आहे की त्यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. यावरून असेही दिसून येते की भारत परिस्थिती शांत ठेवू इच्छितो. जर पाकिस्तानने परिस्थिती आणखी चिघळवली तर ते प्रत्युत्तर देण्यास तयार असल्याचेही सरकारने म्हटले आहे. पाकिस्तानने ७/८ आणि ८/९ मे च्या रात्री हे करण्याचा प्रयत्न केला आणि भारताने त्यांच्या निश्चित रणनीतीनुसार, त्याला योग्य उत्तर दिले आहे आणि भविष्यातही असेच करत राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. म्हणजे, दोन्ही देशांच्या विधानांमध्ये आणि दृष्टिकोनात खूप फरक आहे. पाकिस्तान अजूनही खोटेपणा, धमक्या आणि बढाई मारत आहे. तर, भारताच्या दृष्टिकोनाकडे देशाच्या हिताचे रक्षण करण्याचा एक मजबूत संकल्प म्हणून पाहिले जात आहे आणि तो योग्य, न्याय्य आणि प्रमाणबद्ध आहे



### भारताने विश्वासार्हता प्रस्थापित केली...

भारताचे हेतू मजबूत आहेत आणि त्यांची भूमिका स्पष्ट आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि लष्करी अधिकाऱ्यांनी बुधवार आणि गुरुवारी जे सांगितले त्यावरून हे स्पष्ट होते. २०१६ आणि २०१९ मधील हल्ल्यांनंतर भारताचीही अशीच भूमिका होती. सामरिक रणनीतीबद्दल कोणताही गोंधळ नव्हता. यावरून असे दिसून येते की भारत जे काही करतो त्यामागे एक ठोस कारण असते; आणि जगाला भारताच्या म्हणण्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. रशिया, इस्त्रायल, जपान, फ्रान्स आणि बहुतेक मुस्लिम देशही दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळे काहीही म्हणत नाहीत. कारण, पाकिस्तानमधून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांमुळे आणि भविष्यात अशा हल्ल्यांच्या भीतीमुळे ही कारवाई केल्याचे भारताने म्हटले आहे. भारताचा प्रतिसाद हल्ल्याच्या प्रमाणात होता. भारताला परिस्थिती आणखी वाढवायची नाही. यावरून असे दिसून येते की भारत दोषींना शिक्षा करू इच्छितो. पण, तो त्याच्या प्रतिसादात विवेक आणि गांभीर्य देखील राखत आहे. भारताने आपल्या कृतींमुळे दहशतवादी, पाकिस्तानी सैन्य आणि नागरिक यांच्यात फरक केला.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे– प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.– राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द– ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.– ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागृती करा.– केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.– प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.– एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.– पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.– सैन्याच्या तयारी संबधित चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.– सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या

– नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.– शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या– सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

# ट्रान्सपोर्ट कार्यालयात बनावट नोटांची छपाई, पोलिसांची धडक कारवाई ; तीन आरोपी गजाआड

**ठाणे (प्रतिनिधी) –** बनावट नोटांच्या प्रकरणात गुन्हे शाखेने (भिवंडी युनिट) आणखी तिघांना अटक करत पाचशे रुपयांच्या १५ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा आणि या नोटा छापण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. त्यामुळे अटक आरोपींची संख्या आता सहा झाली आहे. तर एकूण ४५ लाख ५० हजारांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली. अटकेतील एका मुख्य आरोपीच्या भिवंडीतील सावद नाका याठिकाणी असलेल्या ट्रान्सपोर्ट कार्यालयात बनावट नोटा छापण्यात येत होत्या. आरोपींनी पहिल्यांदाच या नोटा छापल्या असल्याची माहिती जाधव यांनी दिली आहे.



भिवंडीतील अवचितपाडा येथे काही जण बनावट नोटा घेऊन येणार असल्याची माहिती भिवंडी युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनावणे यांना मिळाली होती. या माहितीनंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज केदार यांच्या पथकाने सापळा लावून ३ मेला सुरज शेंडे, भरत सासे, स्वप्नील पाटील यांना ताब्यात घेत त्यांच्याकडून पाचशे रुपयांच्या तीस लाखांच्या बनावट नोटा जप्त केल्या. नोटांची एकूण ६० बंडल होती. तर, प्रत्येक बंडलमध्ये शंभर नोटा होत्या. शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या तिघांनाही अटक केली. त्यांच्या चौकशीमध्ये आणखीन काही आरोपींची नावे समोर आल्यानंतर सोमवारी रामदास दळवी, विजय कर्णेकर उर्फ विकी आणि शेखर बत्तीन यांना अटक केल्याचे पोलीस आयुक्त अमरसिंह जाधव यांनी सांगितले आहे.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी दळवी याचे भिवंडीतील सावद नाका याठिकाणी ट्रान्सपोर्टचे कार्यालय आहे. याच कार्यालयात बनावट नोटा छापण्यात येत असल्याची बाब चौकशीमध्ये समोर आली आहे. या कार्यालयातून बनावट नोटा छापण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या साहित्यामध्ये लॅपटॉप, प्रिंटर, कटर, बॉन्ड पेपरचा समावेश आहे. तसेच, १५ लाख ५० हजारांच्या पाचशे रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे या कारवाईमध्ये एकूण सहा आरोपींना गुन्हे शाखेने अटक करत ४५ लाख ५० हजारांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत.बनावट नोटा छापण्यासाठी बॉण्ड पेपरचा वापर केला जात असल्याची बाब पोलिसांच्या चौकशीमध्ये उघड झाली आहे. आरोपी आणखी कोणे बनावट नोटांची छपाई करत होते का? याची चौकशी गुन्हे शाखा करीत आहे. आरोपींनी पहिल्यांदाच बनावट नोटा छापल्या असून आरोपी शेखर याला प्रिंटींग संदर्भात माहिती असल्याचे पोलिस उपायुक्तांनी सांगितले.

# उत्तरकाशीत हेलिकॉप्टर कोसळले, तीन मुंबईकरांचा मृत्यू

**उत्तरकाशी (प्रतिनिधी)–** उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत वैमानिकासह एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून एक प्रवासी गंभीर जखमी आहे. जखमी व्यक्तीला उपचारांसाठी एम्स हृषिकेश येथे दाखल करण्यात आले आहे.



हेलिकॉप्टर एअरोट्रान्स कंपनीचे होते. हे हेलिकॉप्टर सहस्त्रधारा हेलिपॅड येथून उड्डाण केल्यानंतर हर्षिलच्या दिशेने येत होते. या हेलिकॉप्टरमध्ये वैमानिक आणि सहा प्रवासी असे एकूण सात जण होते. प्रवाशांपैकी चार जण मुंबईचे आणि दोन जण आंध्रचे रहिवासी होते. मृतांमध्ये तीन मुंबईकर आहेत.

उत्तरकाशी जिल्ह्यात गुरुवार ८ मे २०२५ रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावर गंगनानी जवळ हेलिकॉप्टर कोसळले. दुर्घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, पोलीस, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे पथक आणि स्थानिक यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले.

अपघाताची माहिती मिळताच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी एक्स पोस्ट करुन शोक व्यक्त केला. दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. नियमानुसार मृतांच्या नातलगांना आणि जखमी व्यक्तीला उपचारांसाठी आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. उत्तराखंडमध्ये मागील दोन – चार दिवसांपासून वातावरण प्रतिकूल आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अवकाळी पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी गारपीट झाली आहे. वादळी वारे वाहू लागल्यामुळे काही ठिकाणी नुकसान झाले आहे.

**हेलिकॉप्टर अपघातातील मृतांची यादी**

कला सोनी, ६१, मुंबई,विजया रेड्डी, ५७, मुंबई, रुची अग्रवाल, ५६, मुंबई, राधा अग्रवाल, ७९, उत्तर प्रदेश, वेदवती कुमारी, ४८, आंध्र प्रदेश,वैमानिक रॉबिन सिंह, ६०, गुजरात

## स्विमिंग पूलमध्ये बुडुन ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

**परभणी (प्रतिनिधी) –** शहरातील एका जलतरणीकेत बुडून ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना परभणीत घडली आहे. शहरातील मोहमदिया मशीद परिसरात राहणारे असलम खान हे दररोजच्या प्रमाणे आपल्या मित्रांसमवेत जलतरणीकेत पोहण्यासाठी आले होते. मात्र, काही वेळाने ते दिसेनासे झाले, त्यामुळे मित्रांनी त्यांना शोधायला सुरुवात केली तब्बल ३ तास जलतरणीकेतील कर्मचाऱ्यांनी शोधल्यानंतर त्यांचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. दरम्यान परभणी महानगरपालिकेने ही जलतरणीका खासगी तत्वावर चालवण्यास दिली आहे, काही वर्षांपूर्वी असाच एका तरुणाचा मृत्यू येथे झाला होता. त्यानंतर पुन्हा एकदा तशीच घटना घडल्याने येथे पोहण्यासाठी, सरावासाठी येणाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उन्हाळा सुरू असल्याने सध्या नदी, तलाव, स्विमिंग पूल आणि इतर ठिकाणी पोहोण्यासाठी नागरिक गर्दी करताना दिसून येतात.

# महाराष्ट्राची वित्तीय शिस्त आणि आर्थिक विकासातील योगदान कौतुकास्पद –डॉ. पनगढिया

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राच्या वित्तीय शिस्तीचे आणि देशाच्या आर्थिक विकासात राज्याच्या भरीव योगदानाचे सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया यांनी कौतुक केले. सह्याद्री अतिथीगृह येथे सोळाव्या वित्त आयोगाची बैठक झाली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पनगढिया, सदस्य डॉ. मनोज पांडा व डॉ. सौम्यकांती घोष यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या वतीने आयोगासमोर निवेदन सादर केले. या निवेदनात आयोगाच्या कार्यसूचीनुसार राज्याच्या विविध मागण्या व सूचना मांडण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाने केंद्र व राज्यांमधील विभागणी ४१ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. तसेच अधिभार व उपकरहे मुख्य करांमध्ये समाविष्ट करावेत आणि केंद्र सरकारच्या करेतर उत्पन्नाचाही समावेश विभागणीच्या निधीत करावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली आहे.

राज्याने क्षैतिज वाटपासाठी नवीन निकष सुचवले आहेत, ज्यामध्ये 'शाश्वत विकास व हरित ऊर्जा' आणि भारताच्या 'जीडीपी'मध्ये राज्यांचा वृद्धीमान योगदान' यांचा समावेश आहे. याशिवाय 'उत्पन्न अंतर निकष' ४५ टक्क्यांवरून ३७.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची विनंती करण्यात आली आहे. राज्याने विशेष अनुदानांतर्गत मुंबई महानगर प्रदेशाच्या आर्थिक मास्टर प्लॅनची अंमलबजावणी, नदीजोड प्रकल्प, नवीन उच्च न्यायालय संकुल, कारागृह पायाभूत सुविधा, वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर वसतीगृहे आणि इको-टूरिझमसाठी एकूण १,२८,२३१ कोटींच्या निधीची मागणी केली आहे. तसेच राज्यासाठी महसूल तूट अनुदान सुद्धा शिफारस करण्याची विनंती आयोगाकडे करण्यात आली.राज्याने आपत्ती निवारण निधी अंतर्गत एकूण तरतूद वाढवावी आणि केंद्र-राज्य वाटपाचा हिस्सा ७५:२५ वरून ९०:१० असा करावा, अशी मागणी केली.स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अनुदान ४.२३ टक्क्यांवरून ५ टक्के विभागणी निधीतून करावे तसेच राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार या अनुदानाचे वितरण करावे. शहरे व महानगरपालिकांसाठी सार्वजनिक बस वाहतूक व अग्निशमन सेवेसाठीही स्वतंत्र अनुदान द्यावे, अशी विनंती करण्यात आली.


## Change In Name


My old name is SUJEET VENKATRAO DESAI I AM changing AS New Name. SUJEET VENKATRAO DESAI KULKARNI Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- AT POST GANDHI CHOWK BILOLI H.N.1368 TQ BILOLI DIST NANDED 431710 MO.9527775959



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




# मराठवाड्याला गारपिटीनं झोडपलं, तिघांचा अंत; शेती, फळबागांचं नुकसान

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर आणि परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट आणि पाऊस झाल्यामुळे फळबागा आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. तर अंगावर वीज कोसळल्यामुळे तिघांचा मृत्यू झाला. पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपात पाऊस होईल, असा अंदाज जिल्हा कृषी हवामान केंद्राने व्यक्त केला आहे.

मराठवाड्याच्या काही भागाला सोमवारी अवकाळी पावसाने झोडपले. दुपारी वादळासह गारपीट आणि पाऊस झाला. पावसामुळे भाजीपाला, फळबागा आणि शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने जिल्हानिहाय नुकसानीचा प्राथमिक माहिती अहवाल जाहीर केला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कोडापूर (ता. गंगापूर) येथे शेतवस्तीवर राहणारे अशोक नंदू म्हस्के (वय २२) या तरुण शेतकऱ्याचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला. बीड जिल्ह्यातील मगरवाडी (ता. अंबाजोगाई) येथील सचिन मधुकरराव मगर (वय ३५) यांचा अवकाळी पावसात शेतात वीज पडून मृत्यू झाला. ढोरवाडी (ता. वडवणी) येथील अभिमन्यू पांडुरंग नलभे (वय ३६) यांचा सायंकाळी वीज पडून मृत्यू झाला. जालना जिल्ह्यातील परतूर येथील शेख मुख्तार शेख अख्तर कुरेशी यांचा एक बैल वीज पडून दगावला असल्याचे तहसील कार्यालयाने सांगितले. परभणी जिल्ह्यातील कोरवाडी (ता. जिंतूर) येथील समाधान सुदाम कोंडाळ यांच्या शेतातील गोठ्यावर वीज पडून गाय आणि वासराचा जळून जागीच मृत्यू झाला.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यासह जिल्ह्यातील सिल्लोड, खुलताबाद, फुलंब्री, पैठण तालुक्यातील अनेक गावात जोरदार पाऊस झाला आहे. खुलताबाद तालुक्यात वादळामुळे लग्न सोहळ्यात धांदल उडाली. काही ठिकाणी वाऱ्यामुळे मांडव पडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. वैजापूर तालुक्यातील शिऊर, परसोडा भागात पाऊस झाला आहे. ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांची कांदे झाकण्यासाठी धावपळ उडाली होती. पैठण तालुक्यातील बिडकीन, चितेगाव, वडजी परिसरात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. गंगापूर तालुक्यातील लासूर बाजार समितीत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तिथे पावसामुळे धान्याची पोती भिजली आहेत. वाळूज-पंढरपूर भागात गारपीट आणि पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली. या भागात मोठ्या आकाराच्या गारा पडल्या आहेत. शेकटा परिसरात वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर, रोहिलागड परिसरात मोठा पाऊस झाला आहे.

# बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो मार्गाचे लोकार्पण

**मुंबई (प्रतिनिधी) –** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा–वांद्रे–सीप्झ–आरे मेट्रो ३ मार्गिकेवरील टप्पा २ अ बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानका दरम्यानच्या (९.७७ किमी) सेवेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. मेट्रो तीनच्या आचार्य अत्रे चौक ते कुलाबा या मार्गावरील अंतिम टप्प्याचा शुभारंभ येत्या ऑगस्ट महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

मुंबई मेट्रो लाईन–३ (फेज २अ – बीकेसी ते आचार्य अत्रे चौक) सेवेचा विस्तार शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीकेसी स्थानकातून हिरवी झेंडी दाखवून केला. त्यानंतर मान्यवरांनी बीकेसी ते सिद्धीविनायक मेट्रो स्थानकादरम्यान प्रवास करत मेट्रोचा आनंद लुटला.

यावेळी जपानचे महावाणिज्यदूत यागी कोजी सान, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार १ ) दिपाली नितीन देशमुख २ )नेत्तिक नितीन देशमुख दोघे रा. फुलेनगर नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिलेला माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस, या जाहीर प्रगटन दुवे सुचित करण्यात येते की मोजे बारड ता. मुदखेड जि. नांदेड येथे गट क्रमांक ६८० क्षेत्रफळ २ हेकतर ८७ आर शेतजमिन माझे पती नामे नितिन शेषराव देशमुख यांचा नावे आहे माझे पक्षकार व नितिन देशमुख हे नात्याने पती पत्नी आहेत. त्यांचा नैतिक देशमुख हा मुलगा आहे. नितिन देशमुख यांना दारूचे व्यसन असलामुळे घरात नेहमी भांडण तंटा होत आहे. त्यामुळे माझे पक्षकार मुलासहित त्यांच्या वडिलांचा घरी राहत आ-हेत. सदर शेतामध्ये माझे पक्षकारयांचे कायदेशीर पत्नी या नात्याने हक्क संबंध आहेत. तरी व्यसनाचा गैरफायदा घेउन ईतर कोणीही लोक वरील शेतजमिनिशी संबधित करारनामा, सौधाचीठी, बक्षीस पत्र, खरेदी विक्री इत्यादी, व्यवहार करण्यात येऊ नये. त्यास माझी कायदेशीर हरकत असेल. सदर शेतजमिनीमध्ये आम्ही हिंदू कायदा प्रमाणे समान मालक हिस्सेदार, कब्जेदार आहोत

तरी, जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझा पक्षकार यांच्या संमतीशिवाय सदर शेतजमिनीचा खरेदीविक्रीचा व्यवहार करू नये. सदरचा व्यवहार माझा पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घावी विना संमती व्यवहार झालास माझे पक्षकार दिवाणी व फोजादारी दावादाखल करतील यांची न्यानोंद घावी करिता जाहिर प्रगटन

**मार्फत**
**ॲड.बी.ल.थोरात**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**
**जि.नांदेड**

**जाहीर प्रगटन देणार**
**दिपाली नितीन देशमुख**
**ह.मु.रा.बारड ता.मुदखेड**



**नमुना १**
**(नियम १४ व २४ पहा)**

## महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ यांच्या कलम १५०(२)अन्वये सुचना

**ज्याअर्थी तालुका–भोकर** **गाव –भोकर**

**गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे**

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोदीचा अनुक्रमांक | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरूप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भूमापन व उपविभाग क्रमांक |
|---|---|---|
| १०८७९ | नोंदीचा प्रकार–खरेदी , माहिती मिळालेचा दिनांक ८/५/२०२५ फेरफारचा दिनांक ९/५/२०२५ लिहून देणार–महमद ताहेर गुलाम ताहेर अनसारी रा. भोकर ( खाता क्रमांक ११४३) यांचे गट/ सर्व्हे क्रमांक १२८, लागवडीयोग्य क्षेत्र ०.१६३१ हे.आर.चौ.मी पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००८१ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी हे त्यांनी संमती देणारे खातेदार : सचिन सुर्यकांत चीद्रावार ( खाता क्रमांक :- (०) दस्त क्र. २४४/२००४ दिनांक २०/०२/२००४ लिहुन घेणार : बालाजी किशनराव माने, ( खाता क्रमांक :- १०३८३) गट / सर्व्हे क्रमांक १२८ लागवडीयोग्य क्षेत्र ०.००८१ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी यांना दुय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक २२२ दिनांक १३/०२/२०२० प्रमाणे रक्कम रुपये १३०००० घेऊन खरेदी दिली. सबब खरेदी घेणा-याचे नाव गाव नमुना नं. ७/१२ वर दाखल केले. | १२८ |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते ; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे.

त्याअर्थी आता मी, अनिल तुकाराम मुनेश्वर

ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याव्दारे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी भोकर यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण –भोकर
दिनांक ९/५/२०२५

| नाव | पत्ता |
|---|---|
| चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची तारीख | – |
| बालाजी किशनराव माने | – |
| महमद ताहेर गुलाम ताहेर अनसारी | – |
| सचिन सुर्यकांत चिद्रावार | नांदेड |

**अनिल तुकाराम मुनेश्वर**
**तलाठी सज्जा भोकर**
**ता.भोकर जि.नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# विजेचा लपंडाव : आ. बोंढारकरांनी महावितरणला धरले धारेवर

## आपत्तीच्या काळातही वीजपुरवठा खंडीत होणार नाही याची काळजी घ्या




**नांदेड (प्रतिनिधी)–** आठ दिवसांपासून शहर व जिल्ह्यात विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना धारेवर धरले. वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या आहेत.

या बैठकीला महावितरणचे अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता धनबहादुर, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय पाटील गिरडे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, शंकर पिनोजी, अशोक उमरेकर, तुलजेश यादव, उद्धव पाटील शिंदे, अमोदसिंघ साबळे, बालाजी पाटील सपुरे, सुरेश पाटील वांगीकर, श्याम पाटील वानखेडे, पप्पू गायकवाड, सुदीन पाटील बागल, रवी थोरात यांच्यासह महावितरणचे शाखा अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

गेल्या आठ दिवसांच्या काळात नांदेड शहर व जिल्ह्यात वीज पुरवठा सातत्याने खंडीत झाला आहे. नांदेड शहरात तब्बल १६ तास वीज पुरवठा खंडीत होता. संपूर्ण रात्रभर वीज पुरवठा खंडीत राहिल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. याशिवाय दररोज दोन-तीन तासांनंतर वीज पुरवठा खंडीत होत आहे. वातावरणात बदल झाला, थोडासा पाऊस पडला, हवा सुटली की, लगेच वीज गुल होते. सतत वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतीच्या मशागतीची कामे रखडत आहेत. व्यापाऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत, तर विद्यार्थ्यांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सध्या परीक्षेचा काळ असल्याने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे अभ्यासात व्यत्यय येत आहे. या बाबीकडेही आ. बोंढारकर यांनी प्रकर्षाने महावितरणच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

### विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाकडे वेधले लक्ष

सध्या परीक्षांचा काळ आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सतत होणाऱ्या खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचा असतांनाही खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याने त्यांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. ही बाब लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचनाही आ. बोंढारकर यांनी यावेळी दिल्या.

# तिरुपती सहकारी संस्थेचे अध्यक्ष, सेक्रेटरीसह आठ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

## बनावट कागदपत्राधारे जमीन विक्री प्रकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** मोकळ्या भूखंडाच्या कारणावरून धनेगाव येथील तिरुपती सहकारी संस्थेचे अध्यक्ष सचिवासह आठ जणांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी मारुती देशमुख रा. धनेगाव शिवारातील जूना सर्वे नं. ११२/३ व नविन ९५/१/३ मालकी व नावावर असलेली १ हेक्टर १२ गुंठे जमीनीवर तिरूपती सहकारी संस्था धनेगावचे अध्यक्ष मायकल जगदाळे रा.अंबिकानगर नांदेड, सेक्रेटरी सुरेश मोतीराम शिंदे रा.धनेगाव, तुकाराम विठ्ठल कोकूलवार सरपंच रा. दत्तनगर नांदेड, गंगाधर उर्फ पिन्टु प्रताप शिंदे ग्रामसेवक रा.धनेगाव नांदेड, व्ही.पी. सुर्यवंशी ग्रामपंचायत कारकून रा.नांदेड, शेख मुखतार रा. मुजामपेठ ग्रा.प. सदस्य, गंगाधर भगवान देशमुख रा. धनेगाव ता. जि. नांदेड व इतर संबंधीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे वडील गोविदराव नरसिंगराव देशमुख यांनी सोसायटीला १ एकर ४० आर जमिन विक्री केली. त्यांनी अधिकचे फिर्यादीचे नावावर झालेले सर्वे नं.९५/१/३ मधील १ हेक्टर १२ गुंठे जमीन बनावट कागदपत्र तयार केले. ते खरे असल्याचे दाखवुन सोसायटीच्या सदस्यांना परस्पर विक्री करुन त्यांना अल्टीमेन्ट देवून (प्लॉट मालकी हक्क प्रमानपत्र) दिले आणि त्या आधारे ग्राम पंचायत कार्यालय रेकॉर्डवर लावून नमूना नं ८ नोंद घेवून खरेदीदार सदस्याने सदर जागा खरेदी केली. हे करताना कोणत्याही प्रकारची चौकशी न करता फिर्यादीचे जागेत अतिक्रमण करून फिर्यादीची फसवणूक केली आहे.

फिर्यादीचे वडील मृत झाल्यानंतर फिर्यादीच्या सहा भावांमध्ये सदर जमीन फिर्यादीचे हिश्श्याला आल्याने फिर्यादीस या जमीनीसाठी सन २०१९ पासूनसंबंधीत कार्यालयात व सोसायटीत अर्ज करुन न्याय मिळाला नाही. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशावरून वरील संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पान १ वरून...

### अवैध व्यवसाय विरोधी...

गांजा जप्त करुन चांगली कामगिरी केली आहे. उपरोक्त कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.
सदर मोहिमेदरम्यान, सातत्याने अवैध व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध तडीपार, एम.पी. डी.ए. व प्रकरण परत्वे मोक्का कायद्याखाली देखील कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या असून, सद्या अशा व्यक्तीविरुध्दचे गुन्हे अभिलेख पडताळणीचे काम सुरु आहे. आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या परपवशवीरपसश.ररहरेश्रिळलश. सेीं.ळप या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# पाणीटंचाई निवारणार्थ किनवटमध्ये ६ टँकरचे लोकार्पण



**किनवट (प्रतिनिधी)–** उन्हाळ्याच्या सरतेशेवटी किनवट,माहूर शहरासह ग्रामीण भागात पाण्याची टंचाई जाणवत आहे. पाणी टंचाईवर काही अंशी मात करण्यासाठी आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनात ॲड. प्रतीक केराम यांच्या पुढाकारातून जंगो रायताड प्रतिष्ठानच्यावतीने सहा टँकरचे शुक्रवारी दि.९ भागवताचार्य दिनेशगुरु कुलकर्णी संभाजीनगरकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. पाणीटंचाईचा काळात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे दिनेशगुरु कुलकर्णी यांनी स्वागत केले.

याप्रसंगी ॲड. प्रतीक केराम यांच्यासह भाजप मंडळाध्यक्ष स्वागत आयनेनीवार, दक्षिणचे अध्यक्ष सूर्यकांत अरंडकर,उत्तरचे उमाकांत कऱ्हाळे पाटील, बाबुराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,श्रीनिवास नेम्मनीवार, अजय चाडावार, दत्ता आडे, शिवा आंधळे, शिवा क्यातमवार, सुनील मच्छेवार, गौरव इटकेपेल्लीवार, जगदीश तिरमनवार, ॲड. माज बडगुजर, राकेश बोंपीलवार, जय वर्मा, सागर पिसारीवार, बालाजी धोतरे, शेखर चिंचोळकर, नरसिंग तक्कलवार, शंकर मानकर, रवी चव्हाण, कृष्णा कडकुंटलावार, आशुतोष बेदरे, चंद्रकांत नेम्मानीवार, राहुल दरगुलवार, सुरेश साकपेल्लीवार, साहील, निसार भाटी आदींची उपस्थिती होती. किनवट शहर, गोकुंदा, इस्लापूर, माहूर शहरासह तीव्र टंचाई असलेल्या भागात या टँकरने पाणीपुरवठा केला जाणार आहे. यासाठी लागणारा खर्च जंगो रायताड प्रतिष्ठान करणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रतीक केराम यांनी यावेळी दिली.

# शुक्रवारी जि.प.च्या पाणीपुरवठा, बांधकाम ग्रामपंचायत विभागाच्या बदल्या पडल्या पार

## प्रशासकीय १९ तर विनंतीवरून ४७ बदल्यांचा समावेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेअंतर्गत आज ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम आणि ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या पार पडल्या. ही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडली. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बदली प्रक्रिया पार पडली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. जी. गंगथळे आदींची उपस्थिती होती.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागात कनिष्ठ अभियंता संवर्गातील एकूण ३ बदल्या झाल्या असून त्यापैकी एक प्रशासकीय कारणास्तव व २ बदल्या विनंतीवरून करण्यात आल्या. बांधकाम विभागात एकूण १८ बदल्या पार पडल्या असून त्यामध्ये शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता प्रवर्गात प्रशासकीय ४ आणि विनंतीवरून ५ बदल्या, तर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गात प्रशासकीय ५ तर विनंतीवरून ४ बदल्या करण्यात आल्या आहेत.

ग्रामपंचायत विभागातील विविध संवर्गांमध्ये एकूण ८० बदल्या पार पडल्या. यात विस्तार अधिकारी (सांख्यिकी) संवर्गात एकूण ८ बदल्या – प्रशासकीय ५ आणि विनंतीवरून ३, विस्तार अधिकारी (पंचायत) संवर्गात ६ बदल्या झाल्या यात प्रशासकीय २ व विनंतीवरून ४ बदल्या झाल्या. ग्राम पंचायत अधिकारी संवर्गात एकूण ६६ बदल्या झाल्या आहेत. यात प्रशासकीय १९ तर विनंतीवरून ४७ बदल्यांचा समावेश आहे.

ही संपूर्ण बदली प्रक्रिया समुपदेशन पद्धतीने व पारदर्शकपणे पार पडल्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष अमृत शिंदे, सचिव धम्मानंद धोत्रे, मानद अध्यक्ष जय वनसागरे, कार्याध्यक्ष श्रीनिवास मुगावे, कृषी अध्यक्ष सय्यद नजीर, उपाध्यक्ष आनंद शेळके, भास्कर कळणे, जिल्हाध्यक्ष मधुकर मोरे, तुकाराम शिंदे, नारायण काळे, प्रसिद्धी प्रमुख आनंद कदम आणि इतर पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार व उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे यांचे आभार मानून त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.




**नांदेड :** दि. ५ मेपासून पटना (बिहार) येथे सुरु असलेल्या ७ वी खेलो इंडिया युथ स्पर्धेमध्ये महाराष्ट्र सेपकटाकरॉ मुलीच्या संघाने ब्राँझ मेडल पटकावले. नांदेडची तेजस्विनी काळे हिचा सहभाग असणाऱ्या संघाने हरियाणा, ओरिसा आणि तेलंगणा या संघांचा पराभव केला.

# अर्धापूर तालुक्यात जनावरे पळविणारी टोळी सक्रिय; शेतकऱ्यात भितीचे वातावरण

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांची जनावरे पळविणारी टोळी सक्रीय झाली आहे. या टोळीने चार चाकी वाहने घेऊन शेतात रात्री बेरात्री वाहनात घालून जनावरे पळवून नेले असल्याची तक्रार अर्धापूर पोलीस ठाण्यात तक्रार दि.९ शुक्रवारी रोजी केली आहे.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची जनावरे पळविणाऱ्या टोळीने तालुक्यात धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी आपल्या आखाड्यावर गाय, म्हैस, बैल बांधून घराकडे जात असतात. काही शेतकरी आखाड्यावर एकटे झोपतात. पण जनावरे पळविणारी टोळी शेतकऱ्यांना शस्त्रांचा धाक दाखवून आखाड्यावरील जनावरे पळवून नेतात. राजू साळुंखे यांच्या शेतातील लाल कंधारी गाय (किंमत ३५००० हजार रुपये) चोरून काळा स्कॉर्पिओ मध्ये टाकून घेऊन जात असल्याची माहिती शेत शेजाऱ्यांनी मोबाईलवर दिली. शेतकरी व त्यांचा भाऊ शेतात रस्त्याने येत असतांना महिंद्रा एक्सयुव्ही फोर व्हीलर व काळी स्कॉर्पिओ दिसली. तिला थांबवण्याचा प्रयत्न केला असता तस्करांनी त्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला.तसेच हातात शस्त्र घेऊन मारहाण करण्याचा सुध्दा प्रयत्न केला असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी पोलिसात केली आहे. जनावरे पळविणारा टोळीचा पोलिसांनी बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# जिल्ह्यात मटका जुगार अड्ड्यांवर पोलिसांच्या कारवाया; वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी अवैधरित्या चालणाऱ्या मटका व तिर्रट नावाच्या जुगारावर पोलिसांनी आठ मे रोजी सायंकाळच्या सुमारास कारवाया केल्या. लोहा, भाग्यनगर, किनवट, हदगाव आणि सोनखेड ठाण्याच्या हद्दीत चालणारे अड्डे उध्वस्त केले. या प्रकरणी पोलिसांनी जुगाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बॉबी बार समोर अनिल सताजी जाधव (वय ५० रा. प्रभातनगर नांदेड) हा बेकायदेशीररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत होता. भाग्यनगर पोलीस ठाण्याचे दिलीप राठोड यांनी त्याठिकाणी कारवाई करून अनिल जाधव याला अटक केली व त्याच्याकडून २१४० रुपये जप्त केले. दिलीप राठोड यांच्या फिर्यादीवरून




भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार वसमतकर करत आहेत.

किनवट शहरातील भाजी मार्केटच्या मोकळ्या जागेत कपिल नामदेवराव ठपके (वय ३६ रा. सिद्धार्थनगर, किनवट) हा मिलन डे ओपन नावाचा मटका जुगार खेळवीत होता. त्यालाही किनवट पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस हवालदार सुरेश घुगे यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात कपिल ठपकेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार वाडगुरे करत आहेत.

तिसऱ्या कारवाईत हदगाव शहरातील मुन्ना गल्ली भागात ज्ञानेश्वर धोंडीबा गोडसे (वय ३०), विश्वास बापूराव शिंदे (वय ३८), शेख अहमद शेख अली (वय ३२) व इतर हे विनापरवाना बेकायदेशीरित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत होते. पोलिसांनी त्या ठिकाणी कारवाई करून वरील चार जणांना अटक करून पाच दुचाकी जप्त केल्या आहेत. तर डावावरून नगदी ९ हजार ६५० रुपये जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केले आहेत. पोलीस अंमलदार तातेराव हरण यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात वरील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौथ्या कारवाईत सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेवडी बाजार येथे संतोष संभाजी गवळी (वय ४० रा. जवळा) आणि त्याचे दोन साथीदार हे विनापरवाना बेकायदेशीररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत होते. पोलिसांनी त्या ठिकाणी कारवाई करून त्यांना अटक केली. त्याच्याकडून अगदी आठ हजार नऊशे पन्नास रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. त्या सर्व कारवाया आठ मे रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आल्या. सहायक पोलीस उपनिरीक्षक गणपत गीते यांच्या फिर्यादीवरून संतोष संभाजी गवळी व त्याच्या साथीदाराविरुद्ध सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार हंबर्डे करत आहेत.

# वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या सोलार पॅनलचे नुकसान; पंचनामा करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा व शहरात मागील आठवड्यापासून दररोज सायंकाळच्या सुमारास वादळी वारे तर काही भागात गारपीट होत आहेत. शेतकऱ्यांना याचा पाच व सहा मे रोजी झालेल्या वादळ वाऱ्यामुळे मोठा फटका बसला आहे.

नांदेड तालुक्यातील तळणी शिवारातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरीवर लावण्यात आलेले सोलार पॅनल तुटून पडले आहेत. या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. महावितरणच्या विजेचा लपंडाव होत असल्याने शासनाकडून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीला पाणी मिळावे यासाठी सोलार पॅनल देण्यात आले मात्र हे सोलार पॅनलही या



वादळी वाऱ्यामुळे क्षतीग्रस्त झाले. तळणी येथील शेत गट नंबर ९८ मधील शेतकरी वैभव उल्हासराव कोकाटे पाटील यांनीही आपल्या शेतात सोलार पॅनल लावले होते. त्यावर त्यांचे कृषी पंप चालत असताना अचानक वादळी वारे आले. यात सोलर पॅनल कोलमडून पडल्याने कृषी पंप बंद पडले. परिणामी शेतातील उभी पीके वाळून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणात महसूल विभागाने तात्काळ नुकसानीचा पंचनामा करून नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com